अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. १० सप्टेंबर २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ३४२ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## विवाहित महिलेवर वारंवार अत्याचार ; तरुणावर गुन्हा

**सोलापूर** : घरा शेजारीच राहणाऱ्या तरूणाने फोन पेद्वारे पीडित विवाहितेच्या नवऱ्यास वेळोवेळी दिलेल्या हातउसने पैशाच्या मोबदल्यात ओळख व जवळीक वाढवून गोड बोलून शहरा बाहेरील लॉजवर नेऊन अत्याचार केला. याप्रकरणी पीडित विवाहितेने तरुणाच्या विरोधात जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे .

या घटनेतील विवाहिता ही घरकाम करणारी आहे. घरा शेजारीच राहणाऱ्या झाकीर शेख या नराधमाने पीडितेच्या नवऱ्यास फोन पेद्वारे हात उसने पैसे दिले. त्याने या व्यवहारात माझ्याशी जवळीक साधली.

एका महिन्यापूर्वी सकाळच्या सुमारास लॉजवर नेऊन मनाविरुद्ध जबरदस्तीने शरीर संबंध केले. तसेच अर्धनग्न फोटो काढून ते फोटो पतीस दाखवतो असे म्हणून अत्याचार केला.त्यानंतर वारंवार तीन वेळा त्याच लॉजवर नेऊन अत्याचार केला.दि. ७ सप्टेंबर रोजी घरासमोर येऊन तू जर माझ्यासोबत संबंध ठेवले नाही तर मी तुझ्या बहिणीचा संसार उध्वस्त करतो.तसेच तू माझी नाही तर तुला कोणाचीच होऊ देणार नाही.असे म्हणून धमकी दिली, अशी फिर्याद विवाहितेनी दिली आहे.

झाकीर शेख याच्या विरोधात जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

# पाणीही सोडण्याचे 'फर्मान' सोडले
# शिंदे सरकारचे 'टेन्शन' वाढले

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

## नवा 'जीआर'ही धुडकावला, तिढा नाही सुटला

**महायुतीचे सरकार आणि उपोषणकर्ते मनोज जरांगे-पाटील यांच्यात शनिवारी देखील समझोता होऊ शकला नाही. सरकारने शिष्टाईच्या माध्यमातून केलेला दुसरा प्रयत्नही फोल ठरला. माजी मंत्री अर्जून खोतकर हे सरकारचा लिफाफा घेवून जालन्याच्या अंतरवाली सराटीला गेले. लिफाफ्यातील खलिता जरांगेंनी पाहिला. तेव्हा त्यांचा पारा चढला. सरकारचा नवा जीआरही त्यांनी धुडकावला. उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्धार त्यांनी केला.आजपासून पाणी त्याग करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. सरकार 'वंशावळी' शब्द काढायला तयार नाही तर वंशावळी शब्द काढून सरसकट कुणबी दाखला देण्याचा जरांगेंनी हट्ट धरला. उपोषण सोडण्याची मुख्यमंत्र्यांनी विनंतीही त्यांनी फेटाळून लावली. त्यामुळे तिढा सुटलाच नाही. यामुळे आता सरकार आणि जरांगे समर्थक यांच्यातील संघर्ष चिघळण्याची शक्यता दिसत आहे.**





मराठा कुणबी वंशावळींच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी मुंबईत शुक्रवारी रात्री सरकार आणि जरांगे शिष्टमंडळ यांच्यात चर्चा झाली. चर्चेसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खास विमान करून शिष्टमंडळाला मुंबईला बोलावले होते. चर्चेनंतर जरांगे हे कोणती भूमिका घेणार याकडे साऱ्या महाराष्ट्राचे लक्ष लागून होते. शिंदे यांनी नवा जीआर खोतकर यांच्या हाती दिला आणि खोतकर हे पुन्हा सराटीला गेले. खोतकरांनी तो जीआर जरांगेंच्या हाती दिला. त्यांनी तो सविस्तरपणे वाचला त्यांनतर त्यांनी उपोषण सुरूच ठेवण्याची भूमिका स्पष्टपणे सांगितली. शासनाच्या जीआरमध्ये कोणतीही दुरुस्ती झाली नाही, असा आरोप त्यांनी केला.

उपोषणकर्त्यांवर लाठीचार्ज करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर अजुनही सक्तीची कारवाई करण्यात आलेली नाही. फक्त सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. आमच्यावर गोळ्या झाडणारे अधिकारी शिष्टमंडळात फिरत आहेत. आमच्यावर दाखल करण्यात आलेले गुन्हे तत्काळ मागे घेण्यात यावे, अशी मागणी जरांगे यांनी केली आहे.

सरसकटचा आदेश काढा...

सरकारने पहिला जीआर काढल्यावर त्यात निजामकालीन कुणबी नोंद असलेल्यांना तत्काळ कुणबी प्रमाणपत्र देण्याचा उल्लेख करण्यात आला होता. मात्र, जरांगे यांनी हा जीआर अमान्य करत, त्यात उल्लेख असलेला वंशावळ हा शब्द काढून सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याची मागणी केली होती. त्यानुसार, शुक्रवारी पुन्हा एकदा सरकार आणि जरांगे यांच्या शिष्टमंडळाची बैठक झाली. या बैठकीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणखी नवीन जीआर काढून तो बंद पाकिटात जरांगे यांना पाठवला होता. तसेच, उपोषण मागे घेण्याची विनंती केली होती. मात्र, जरांगे यांनी हा नवीन जीआर देखील धुडकावून लावला आहे. तसेच, सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचा उल्लेख असलेला जीआर काढण्याची मागणी केली आहे. तसेच जोपर्यंत असा जीआर निघणार नाही, तोपर्यंत उपोषण सुरूच राहणार असल्याचे जरांगे यांनी स्पष्ट केले आहे.

### आता वेळ संपली; जरांगे आक्रमक

मराठा आरक्षणासंबंधी राज्य सरकारला दिलेली वेळ संपली असून आजपासून सलाईन काढून टाकणार आणि पाणीही बंद करण्याचा इशारा जरांगे यांनी दिला आहे. चार दिवसांपूर्वी त्यांनी आपण सरकारला चार दिवसांची वेळ देत असून, त्यानंतर पाणी आणि उपचार घेण्यास त्याग करणार असल्याचा इशारा दिला होता. मात्र चार दिवसात आरक्षणाच्या मुद्यावर कोणताही तोडगा निघाला नाही. त्यामुळे आपण रविवारपासून पाणी आणि उपचार घेण्यास त्याग करणार असल्याची माहिती जरांगे यांनी दिली. आरक्षणाच्या मुद्यावरून जरांगे आक्रमक झाल्याचे दिसत आहे.

### काय म्हणाले जरांगे?

दरम्यान याबाबत बोलतांना जरांगे म्हणाले की, माझे आमरण उपोषण सुरु आहे. सरकारच्या सांगण्यावरून आतापर्यंत उपचार आणि पाणी घेत होतो. पण त्यांना दिलेल्या मुदतीचा आजचा शेवटचा दिवस आहे. रविवारी सकाळपासून अन्न, पाणी आणि सरकारकडून सुरु असलेल्या उपचाराचे देखील त्याग करणार आहे. सोबतच आता पुढील चर्चेसाठी जायचे की, नाही याबाबतीत आम्ही महाराष्ट्र पातळीवर आमची एक बैठक घेणार आहे. त्यात पुढील निर्णय घेतला जाणार असल्याचे जरांगे म्हणाले.

### २००४ च्या जीआरनुसार निर्णय घ्यावा...

आमची मागणी अशी आहे की, मराठा समाजाला कुणबी जात प्रमाणपत्र मिळावे. त्यानुसार जीआरमध्ये दुरुस्ती करण्याची मागणी आहे. मात्र, तशी दुरुस्ती आज आणलेल्या जीआरमध्ये आम्हाला आढळून आली नाही. त्यांच्या जीआरमध्ये कुणबी आणि मराठा असं वेगळ करण्यात आले आहे. तुमच्याकडे जर कुणबी असल्याचे वंशावळ पुरावे असतील तरच कुणबी असल्याचे प्रमाणपत्र मिळणार असल्याचा त्यात उल्लेख आहे. पण आमची मागणी अशी आहे की, २००४ च्या जीआरनुसार मराठा समाजाला तातडीने मराठा कुणबी असल्याचे प्रमाणपत्र देण्यात यावे. याबाबत स्पष्ट अशी ओळ आम्ही लिहून दिली होती. पण जे बोलणं झालं होतं ते जीआरमध्ये नाही. त्यामुळे मराठा समाजाला सरसकट कुणबी असल्याचे जोपर्यंत प्रमाणपत्र मिळत नाही तोपर्यंत माझा लढा सुरूच राहणार असल्याचे मनोज जरांगे म्हणाले आहेत.

### सरकारचे टेन्शन वाढणार !

आधीच जरांगे यांचा बीपी कमी झाला होता. तसेच त्यांच्या किडनीवर देखील परिणाम होत असल्याचं डॉक्टरांनी म्हटले होते. त्यामुळे त्यांच्या पाणी न घेणे आणि उपचारासाठी नकार देण्याच्या भुमिकेमुळे प्रकृतीवर परिणाम करू शकते. त्यामुळे जरांगे यांच्या या निर्णयामुळे सरकारचे टेन्शन वाढणार आहे. तर, त्यांनी आपली भूमिका बदलण्याबाबत त्यांच्याकडे प्रशासनाकडून विनंती केली जाण्याची शक्यता आहे.

## सावंत बंधूच्या आरोग्य शिबिराची वर्ल्ड रेकॉर्ड बुकमध्ये नोंद

### मुख्यमंत्र्यांनी केले अभिनंदन

सुराज्य/सोलापूर

राज्याचे आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत , जिल्हा शिवसेना संपर्कप्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत यांनी आषढीवारीच्या निमित्ताने विठ्ठलाच्या दर्शनाला आलेल्या प्रत्येक भक्तांची आरोग्य तपासणी करण्यासाठी आरोग्याचा महासागर भरवला होता.

पंढरपूर आणि सोलापूर शहरात दोन ठिकाणी भरवण्यात आलेल्या आरोग्य शिबाराच्या माध्यमातून समान्य नागरिकांकाच्या आरोग्याची तपासणी केली गेली. पंढरपुरात भरवण्यात आलेल्या जगातील सर्वात मोठा मेडिकल कॅम्प म्हणजेच आरोग्य शिबिराची जागतिक वर्ल्ड बुकने नोंद घेतली आहे. तसे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. यामुळे सावंत बंधूचे मुख्यमंत्र्यांनी अभिनंदन केले आहे.

आषढीवारीच्या दिवशी विठ्ठलाच्या दर्शनाला आलेल्या प्रत्येक भक्तांची आरोग्य तपासणी करण्याचे नियोजन आरोग्य मंत्री तानाजीराव सावंत यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते. पंढरपुरात ५ हजार सातशे डॉक्टरांच्या मदतीने ११ लाख ६४ हजार ६८४ रुग्णांची एकाच वेळी आरोग्य शिबिरात संपूर्णपणे तपासणी करण्यात आली होती. या शिबिरात सर्वांची संपूर्णपणे तपासणी करण्यात आली. या सर्व रुग्णांवर प्राथमिक उपचार करून प्राथमिक तपासण्या करून तात्काळ उपचार तपासणी करण्यात आली. जवळपास दोन लाख चष्म्यांचे वाटप करण्यात आले. गंभीर आजार निष्पन्न झालेल्या रुग्णांना पुढील उपचारासाठी मोफत सोय करण्यात आली. हे आरोग्य शिबिर पार पाडण्यासाठी शिवसेनेचे तब्बल दहा हजार कार्यकर्ते ८ दिवस परिश्रम घेत होते. सोलापुरात देखील मोठ्या प्रमाणात विविध भागात झालेल्या आरोग्य शिबिरात सामान्य नागरिकांची तपासणी करून आरोग्याचा महाजागर भरवला होता. याची दखल जागतिक वर्ल्ड बुकने घेतली आहे. सर्वात मोठा मेडीकल कॅम्प घेत जागतिक रॅकॉर्ड केल्याचे तसे प्रमाणपत्र सावंत बंधूना दिले आहे. आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूर येथे झालेले आरोग्य शिबिर जगातील सर्वात मोठे आरोग्य शिबीर ठरले आहे. सावंत बंधूंचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सावंत बंधूचे अभिनंदन केले आहे.








## मंदिरात चोरी करणाऱ्या तिघांना पकडले

### पावणेदोन लाखांचा मुद्देमाल जप्त

सुराज्य/सोलापूर

एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने मंदीरात चोरी करणाऱ्या तिघांच्या २४ तासात मुसक्या आवळल्या पथकाने शहर व जिल्हयातील सहा गुन्हे उघड झाले असून पावणे दोन लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.अबरार रौफ शेख (रा.नविन विडी घरकुल),प्रेम भास्कर कुणी (रा.बोळकोटे नगर), बालाजी नागेश चिंता (रा.नविन विडी घरकुल) अशी अटक केलेल्या तिघांची नावे आहेत.

निलम नगर भागातील मंदिर चोरी करून दक्षिणा पेटी फोडणारे ४ इसम शांती नगर चौक, स्वागत नगर येथे येणार असल्याची माहिती मिळाली. त्याअनुषंगाने पथकाने सापळा लावून त्यांना ताब्यात घेत असताना त्यातील १ आरोपी पळुन गेला व इतर ३ आरोपींना ताब्यात घेतले. त्यांनी एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील तीन, विजापूर नाका पोलीस ठाणे, जेलरोड पोलीस ठाणे तसेच वळसंग पोलीस ठाणे हद्दीतुन प्रत्येकी एक असे गुन्हे केल्याची कबूली दिली. त्यांच्याकडून रोख रकमेसह एकूण १ लाख ७२ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक राजन माने, शिवशंकर बोंदर यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार विक्रम रजपूत, पोलीस अंमलदार राकेश पाटील,एकनाथ उबाळे,दिपक डोके, सचिन भांगे,मंगेश गायकवाड,शैलेश स्वामी,अमोल यादव, सुहास अर्जुन,काशिनाथ वाघे,शंकर याळगी,अमसिध्द निंबाळ,देविदास कदम,दिपक नारायणकर यांनी केली.

## विखे पाटलांच्या तोंडाला काळे फासणाऱ्यास बक्षिसाची घोषणा

**सोलापूर** : भाजप नेते तथा महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर धनगर आरक्षणाच्या मागणीवरून शेखर बंगाळे यांनी भंडारा टाकल्यानंतर त्यांना तिथेच बेदम मारहाण करण्यात आली. भाजप शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनीही मारहाण केली. त्याचा मल्हार सेनेकडून शनिवारी जालन्यात निषेध करण्यात आला. विखे पाटलांच्या तोंडाला काळे फासणाऱ्यास ५१ हजारांचे बक्षीस मल्हार सेनेकडून जाहीर करण्यात आले. जालन्यातील अंबड तहसील कार्यालयासमोर मल्हार सेनेच्या कार्यकर्त्यांनी शनिवारी निषेध आंदोलन केले. दरम्यान, यावेळी राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या कार्यकर्त्यांकडून धनगर समाजाच्या तरुणास अमानुष मारहाण केल्याचा निषेध करण्यात आला.

## ६ गायी तर १५ शेळ्या पळविल्या

### बोरामणी आणि शिराळ येथील प्रकार

सुराज्य/सोलापूर

बोरामणी (ता.दक्षिण सोलापूर) येथील एका शेतकऱ्याचे ६ गायी तर शिराळ (ता.माढा) येथे एकाचे १५ शेळ्या चोरट्यांनी पळविल्या. या दोन्ही चोऱ्या शुक्रवारी पहाटेच्या सुमारास घडल्याची नोंदी ग्रामिण पोलीसात झाल्या आहेत.

यासंदर्भात बोरामणी येथील विलास दिगंबर पाटील यांनी तालुका पोलिसात तक्रार दाखल केली. त्यांनी शेतातील वस्तीवर नेहमीप्रमाणे गुरुवारी रात्री गाई बांधल्या होत्या. शुक्रवारी पहाटे ते जनावरांना वैरण टाकण्यासाठी वस्तीवर गेले होते. तेव्हा त्यांना एक गीर जातीची गाय आणि अन्य पाच असे एकूण ६ गाई चोरीस गेल्याचे आढळून आले. गाईची किंमत १ लाख २५ हजार इतकी असल्याचे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास हवालदार कालेकर करीत आहेत.

दुसऱ्या घटनेत शिराळ (ता.माढा) येथे राहणाऱ्या बाळू जालिंदर गोसावी यांच्या शेतातील पत्राशेड मधे बांधलेल्या ११ शेळ्या आणि ४ बोकड अशी जनावरे चोरट्यांनी पळविली . गोसावी यांनी घरासमोरील पत्रा शेडमध्ये शेळ्या बांधल्या होत्या. शुक्रवारी पहाटेच्या सुमारास चोरट्याने ७५ हजाराची एकुण १५ जनावरे चोरून नेली. या संदर्भात गोसावी यांनी कुर्डवाडी पोलिसात फिर्याद दाखल केली. तपास सहाय्यक फौजदार गुटाळ करीत आहेत.

## रिक्त पोलीस पाटील पदे भरण्यासाठी मंगळवारी महिला आरक्षण सोडत

**सोलापूर** : माढा आणि करमाळा तालुक्यातील ४८ पोलीस पाटील पदे रिक्त आहेत. यासाठी प्रवर्ग निहाय महिला आरक्षण सोडत मंगळवार १२ सप्टेंबर रोजी १२ वाजता कुर्डुवाडी पंचायत समिती कार्यालय मिटींग हॉल येथे होणार आहे.

माढा येथील लोंढेवाडी, सापटणे भो, अंजनगाव खे, उजनी मा., रोपळे खु, अकुंभे, शेडशिंगे, तांदुळवाडी, शेवरे, तडवळे म., वेणेगाव, वडाचीवाडी अ.ऊ, बुद्रुकवाडी, बिटरगाव, ढवळस, भोगेवाडी, शिंगेवाडी, कव्हे, महादेववाडी, आकुलगाव, रुई, आढेगाव, सुर्ली, भुताष्टे तर करमाळा तालुकयातील वडगाव ऊ, वडगाव द, पिंपळवाडी, जातेगाव, खडकी, कोर्टी, सावडी, विहाळ आदी गावांमधील पोलीस पाटील पदे भरली जाणार आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



पाऊस पडतोय पण खाली येईपर्यंत संपतोय !

कल्याण
780-51-236

## सोलापूरसाठी गुड न्यूज

# दौंडमधून उजनीत २४ हजार क्युसेकचा विसर्ग

सुराज्य/टेंभुर्णी

उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात होत असलेल्या जोरदार पावसामुळे दौंडच्या विसर्गात जोरदार वाढ दिसून येत आहे. शनिवारी सकाळी दौंडचा विसर्ग

केवळ १,३२१ क्युसेक होता त्यामध्ये वाढ होवून संध्याकाळी २४ हजार ७०१क्युसेक झाला आहे, त्यामुळे उजनीच्या पाणीसाठ्यात रविवारी सकाळपासून वाढ होण्यास सुरवात होणार आहे गेल्या दोन दिवसांपासून उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस वाढल्यामुळे कधी कमी तर कधी जास्त पाणी साठा होत होता, परंतु बंडगार्डन येथून येणाऱ्या विसर्गात गेल्या २०-२२ दिवसापासुन घट होत असल्याने त्याचा परिणाम दौंड येथील विसर्ग झाला होता. सकाळी दौंडचा विसर्ग १३२१ होता त्यात आज दुपारपासून वाढ होत असून संध्याकाळी सहा वाजता तो २४,७०१ झाला परंतु हा विसर्ग उजनीत येण्यास जवळपास आठ ते दहा तास लागतात. त्यामुळे रविवारी सकाळपासून उजनीच्या पाणीसाठ्यात वेगाने सुरुवात होणार आहे,

जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांचे लक्ष उजनीतील पाणीसाठ्यावर लागले आहे.पण त्यात वाढ होत असल्यामुळे शेतकऱ्यांमधून आनंद व्यक्त होत आहे. पुणे जिल्ह्यातील होणाऱ्या पावसाने सोलापूरकरांना दिलासा दिला आहे. बंडगार्डन व दौंडमधून येणाऱ्या प्रवाहात अजून वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे उजनीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

उजनीच्या पाणलोट क्षेत्रात असणाऱ्या १९ धरणांपैकी आत्तापर्यंत सहा धरणे शंभर टक्के झाले असून तर आठ धरणे नव्वद टक्क्यांवर आलेली आहेत. केवळ राहिलेली आठ धरणे ५० ते ७० टक्क्यांच्या घरात आहेत. त्यामुळे भीमाशंकर माथ्यावर पडलेला पाऊस हा डायरेक्ट या वीस धरणातून पुढे बंडगार्डन आणि दौंड या मार्गातून आपल्या उजनीत येवून मिळणार आहे त्यामुळे उजनी आपली टक्केवारी ची शतकी खेळी लवकरच पूर्ण करेल अशी आशा निर्माण झाली आहे.



### या धरणातून पाणी सोडण्यात आलेले आहे

चिलेवाडी २५०, कलमोडी ३२८४, आंध्रा १८३, कासारसाई १५० क्युसेक, चसकमान ३६८५, वडिवले ६४१६, पवना ४३२६ असे एकूण २३%८१ क्यूसेक चहा विसर्ग सोडण्यात आला आहे

### सध्या उजनीची पाणीपातळी पुढीलप्रमाणे

एकुण पाणीसाठा...४९२.३४९ मी.
एकुण पाणीपातळी ..२०७५ दलघमी (७३.६७ टीएमसी)
उपयुक्त पाणीपातळी ..२७६ दलघमी (९.६७ टीएमसी)
टक्केवारी .. १८.१३%
विसर्ग ...
दौंड...२४,७०१ क्युसेक ...
बंडगार्डन ... ३,८१९ क्युसेक



## विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनचा वर्धापन दिन साजरा

**सुराज्य/सोलापूर** : महाराष्ट्र राज्यातील वीज क्षेत्रातील अग्रगण्य अशा विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनचा ४६ वा वर्धापन दिन विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला. विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून जिल्ह्यात विविध ठिकाणी रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, आरोग्य शिबिर व स्वच्छता मोहीम घेण्यात आले. सोलापूर मंडळ कार्यालय समोर संघटनेचा ४६ वा वर्धापन साजरा करण्यात आला. याप्रसंगी बारामती परिमंडळ पदाधिकारी ओंकारनाथ गाये, सोलापूर मंडळ अध्यक्ष सुनिल काळे यांनी देखील वर्धापन दिनाच्या शुभेच्छा देऊन आपले मनोगत व्यक्त केले. प्रतिभा येळगे, सुंदर गायगवळी, अनीसा मुलाणी, एम. एम. करजगीकर, दत्तात्रय शिंदे, रवींद्र तुळजापूरकर, सिध्देश्वर क्षीरसागर, सी. एम. पवार, कीर्तीकुमार वेळापूरे, जिक्रिया सय्यद, अश्विन भांगे, शिवशंकर बिराजदार, दयानंद पाटील, राहुल शिर्के, प्रशांत बामणे, श्रीराम सलवदे, पंडित कुंभार, संजयकुमार स्वामी, मनोज कलशेट्टी, शब्बीर पटेल, दत्ता कांबळे, रमेश कोळी, जनार्दन काकी, नरेंद्र भंडारी, लक्ष्मीपुत्र बिराजदार व इतर सभासद उपस्थित होते.

# करमाळा बाजार समितीत जगताप गटाच्या दोन व सावंत गटाची एक जागा बिनविरोध

### १८ जागांसाठी १६१ अर्ज दाखल

**सुराज्य/करमाळा**

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत जगताप गटाचे दोन व सावंत गटाचे दोन संचालक बिनविरोध झाले आहेत. याची फक्त अधिकृत घोषणा बाकी आहे. व्यापारी मतदार संघात दोन जागांसाठी दोन व हमाल-तोलार गटात एका जागेसाठी दोन अर्ज आले आहेत. ते एकाच उमेदवाराचे आहेत. अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी शुक्रवारी तीन वाजेपर्यंत १८ जागांसाठी १६१ अर्ज दाखल झाले आहेत. जगताप, पाटील, बागल व शिंदे या चारही प्रमुख गटांच्या कार्यकर्त्यांनी अर्ज दाखल केले असल्याने ही निवडणूक कशी होईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीसाठी माजी आमदार जयवंतराव जगताप, बागल गटाचे दिग्विजय बागल, उपसभापती चिंतामणी जगताप, माजी आमदार नारायण पाटील यांचे चिरंजीव पृथ्वीराज पाटील, सभापती प्रा. शिवाजी बंडगर, शिंदे गटाचे समर्थक सुजित बागल, चंद्रकांत सरडे, मोहिते पाटील समर्थक डॉ. अमोल घाडगे, भाजपचे दीपक चव्हाण, अमरजित साळुंखे, कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रताप जगताप आदींनी अर्ज दाखल केले आहेत.




**यांनी केले अर्ज दाखल**

**सहकारी संस्था (सर्वसाधारण) :** माजी आमदार जयवंतराव जगताप, शंभूराजे जगताप, रामदास गुंडगिरे, सागर दौंड, जनार्दन नलावडे, विजयसिंह नवले, दिग्विजय बागल, कल्याण सरडे, शिवाजी बंडगर, अशोक हनपुडे, आनंदकुमार ढेरे, काशिनाथ काकडे, नवनाथ दुरंदे, दादासाहेब जाधव, देवानंद बागल, पृथ्वीराज पाटील, राहुल गोडगे, वैभव पाटील, रामेश्वर तळेकर, किरण पाटील, संतोष शेळके, दत्तात्रय गव्हाणे, रंगनाथ शिंदे, सुनील सावंत, धनंजय डोंगरे, दत्तात्रय बदे, अमरजित साळुंखे, तात्यासाहेब शिंदे, महादेव कामटे, महेशराजे भोसले पाटील, सुजित बागल, अशोक शेळके, ज्योतीराम नरुटे, दिगंबर नाझरकर, कुलदीप पाटील, चिंतामणी जगताप, राहुल जगताप, प्रताप जगताप, विशाल केवारे, किरण कवडे, सुनील सावंत, दादासाहेब सरडे, तात्यासाहेब जाधव, नवनाथ दुरंदे, शरद देवकर, बापूराव लोखंडे, पृथ्वीराज राजेभोसले, युवराज मेरगळ, देविदास बरडे, रवींद्र गोडगे, छगन शिंदे, अतुल राऊत, करू गव्हाणे, दीपक चव्हाण, विलास कोकणे व सुहास घोलप.

**महिला राखीव :** देवशाला पाटील, भारती भोसले, शैलाबाई लबडे, साधना पवार, सुलन नलवडे, शैलजा मेहेर, सीता पाटील, नंदाबाई केवारे, अरुणी हिवरे, सविता राऊत, साधना मंगवडे, रुपाली जाधव, विद्या सरडे, प्रेरणाराणी राजेभोसल व सविता माने. इतर मागासवर्ग : विशाल केवारे, जया झिंजाडे, आंनद अभंग, धनंजय शिरसकर, रामहरी कुदळे, शैलजा मेहेर, शिवानी राखेंडे, राजाराम जाधव व रियाज मुलाणी. भटक्या विमुक्त : प्रा. शिवाजी बंडगर, नागनाथ लकडे, अशोक शेळके, संदीप मारकड, बापूसाहेब पाटील, जनार्दन मारकड, लक्ष्मण खोमणे, छगन शिंदे व गणेश काळे.

**ग्रामपंचायत (सर्वसाधारण) :** हरिश्चंद्र झिंजाडे, विलास काटे, विलास पाटील, राजाराम जाधव, काशिनाथ काकडे, रामहरी कुदळे, नवनाथ झोळ, किरण फुंदे, पृथ्वीराज पाटील, जयराम सोरटे, अजित तळेकर, ज्योतीराम नरुटे, दादासाहेब जाधव, प्रवीण भोसले व गोरख लबडे, संजय तोरमल, रंगनाथ शिंदे, सुनील सावंत, महेशराजे भोसले पाटील, उर्मिला पवार, शहाजी माने, डॉ. अमोल घाडगे, धनराज मोरे, दत्तात्रय बदे, अमरजित साळुंखे, महादेव जाधव, कुलदीप पाटील, बालाजी तरंगे, दत्तात्रय गव्हाणे, अमोल दुरंदे, प्रा. शिवाजी बंडगर, लक्ष्मण खोमणे, संदेश शेळके, देविदास बरडे, दिग्विजय बागल, रावसाहेब शिंदे, रुक्मिणी एकाड, निशेल एकाड, अरुणी हिवरे, धनाजी ढेरे, अप्पासाहेब चौगुले, दीपक चव्हाण, सुहास घोलप, चंद्रकांत सरडेव अजिनाथ विघ्ने.

## डॉ. विभूते जागतिक कथा स्पर्धेच्या पुरस्काराने सन्मानित


**सुराज्य/सोलापूर**



अमेरिकेतील डेट्राईट शहरामधून प्रसिध्द होणाऱ्या 'निनाद' या जागतिक मराठी दिवाळी अंकाने आयोजित केलेल्या जागतिक कथा स्पर्धेत प्रा. डॉ. सुनील विभूते यांच्या 'ऑक्सिडीग्रेड' विज्ञान कथेला उत्कृष्ट कथेचा पुरस्कार मिळाला आहे.

या कथा स्पर्धेमध्ये भारत, अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, जपान, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया अशा विविध देशातील शंभराहून अधिक मराठी लेखकांनी भाग घेतला होता. या स्पर्धेचा निकाल बुधवार दि. ०६ सप्टेंबर २०२३ रोजी फेसबुक व इन्स्टाग्रामवरून जाहीर करण्यात आला. अमेरिकन डॉलरच्या स्वरूपात रक्कम व सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. या कथा स्पर्धेसाठी प्रसिद्ध ज्येष्ठ लेखक श्री. रामदास फुटाणे, निलीमा बोरवणकर व मोहना जोगळेकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. 'निनाद' या दिवाळी अंकाने जागतिक कथा स्पर्धा आयोजित करण्याचे हे पाचवे वर्ष आहे.

डॉ. सुनील विभूते यांच्या या यशाबद्दल प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर, डॉ. प्रकाश वडगावकर, प्रसिद्ध शिक्षणतज्ञ डॉ. छाया पाटील, प्रसिद्ध विज्ञान लेखक प्रा. डॉ. संजय ढोले, डॉ. सदानंद बोरसे, प्रा. डॉ. रणधीर शिंदे, मसाप सोलापूर शाखेच्या अध्यक्षा डॉ. श्रुती वडगबाळकर, मसाप बार्शीचे अध्यक्ष श्री. निपाणीकर सर, डॉ. विक्रम निमकर, डॉ. यादव, श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य व सर्व प्राध्यापक आणि जिल्ह्यातील मान्यवर साहित्यिकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. डॉ. विभूते यांना विज्ञान कथा लेखनाबद्दल या पूर्वी अनेक पुरस्कार मिळाले आहेत.



## अक्षदा वाघे हिचे नेट परिक्षेत यश

**सुराज्य/श्रीपूर** : लवंग (ता. माळशिरस) येथील अक्षता शरद वाघ हिने नेट परीक्षेमध्ये ७२० पैकी ५६६ गुण तर सीईटी परीक्षेमध्ये ९९.२४ टक्के गुण मिळवून यश संपादन केले. सकल मराठा बांधवांच्या वतीने तिचा सन्मान करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तिला वडील शरद चांगदेव वाघ व विद्या शरद वाघ, मार्गदर्शन करणारे चैतन्य अकादमी बारामती चे आशिष कटारे, दीपक शर्मा, प्रतिक तिवारी, महेश माने देशमुख आणि सर्व चैतन्य अकादमीचा स्टाफचे मार्गदर्शन लाभले. यावेळी धनाजी साखळकर, रणजित चव्हाण, राहुल बिडवे, कमलाकर मानेदेशमुख, मदन जाधव, आशुभाऊ ढवळे, रणजित पवार अमर काळे, मेहबूब आतार सत्तार शेख सोमनाथ पवार आदी उपस्थित होते.

## महानगरपालिका कामगार संघटना संघर्ष समितीची स्थापना

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूर महानगरपालिका कामगार संघटना संघर्ष समितीची स्थापना करण्यात आली आहे. या नुतन समितीच्या अध्यक्षपदी सायमन गड्डू, कार्याध्यक्षपदी दिलावर मनियार तर जनरल सेक्रेटरी चांगदेव सोनवणे यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती समितीचे संस्थापक जनार्दन शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

एकूण १० संघटना एकत्र येऊन नव्याने सोलापूर महानगरपालिका कामगार संघटना संघर्ष समिती स्थापन केलेली आहे. संघर्ष समिती भविष्यात कामगारांच्या विविध प्रश्नासंबंधी आवाज उठविणार आहे, असे जनरल सेक्रेटरी चांगदेव सोनवणे यांनी सांगितले.

या समितीचे नुतन पदाधिकारी असे: संस्थापक ज्येष्ठ कामगार नेते जनार्दन शिंदे, अध्यक्ष सायमन गड्डू, कार्याध्यक्ष दिलावर मनियार, उपाध्यक्ष बापूसाहेब सदाफुले, डी. एस. म्हेत्रे, मल्लिकार्जुन हुणजे, संगीता गुरव, के. बी. माने, जनरल सेक्रेटरी चांगदेव सोनवणे, सेक्रेटरी माऊली पवार, सहसेक्रेटरी इक्बाल तडकल, खजिनदार विद्या मोरे, संघटक प्रमुख भालचंद्र साखरे, श्रीनिवास रामगल, कार्यकारणी सदस्य दत्तात्रय गायकवाड, महादेव ढेकणे, अंजनया म्हेत्रे, गंगाधर मल्लाडे, संजीव गुंजाळ, गणेश डेंगळे, रेश्मा तलफदार, गीता तमशेट्टी, रेणुका कावील, शिवाजी कांबळे, सादीक शेख, शेखर सकट, भीम सिताफळे, प्रसन्नजीत शिंगे, केरबा माने आदी.

## सॅनिटरी नॅपकिन डिस्पोजेबल मशीनचे वाटप

**सुराज्य/बार्शी**

मातृभूमी प्रतिष्ठान बार्शी, ग्लेनमार्क लाइफ सायन्स कंपनी मुंबई, नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाइंड शाखा लातूर, डॉ. मेतन फाउंडेशन सोलापूर,रोटरी क्लब लातूर होरायझन यांच्या संयुक्त विद्यमाने बार्शी तालुक्यातील ५० शाळा महाविद्यालये व वसतिगृहांना सॅनेटरी नॅपकिन डिस्पोजेबल मशीनचे वाटप करण्यात आले.



येथील शिवाजी महाविद्यालयात झालेल्या या कार्यक्रमास मेतन फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश मेतन, नॅब लातूरचे सेक्रेटरी आशिष बाहेती, अप्पर तहसीलदार वृषाली केसकर, ग्रामीण रुग्णालयाच्या डॉ. शितल बोपलकर, शिवाजी शिक्षण संस्थेचे जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील, मातृभूमीचे सचिव प्रतापराव जगदाळे, संचालक डॉ. लक्ष्मीकांत काबरा यांच्यासह शहर व तालुक्यातील महाविद्यालयांचे मुख्याध्यापक, शिक्षक, महिला शिक्षिका व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

डॉ. व्यंकटेश मेतन यांनी या मशीनची संपूर्ण माहिती देत महिलेचे आरोग्य सदृढ असेल तर समाजाचे आरोग्य नीट रहाते व त्यामुळेच आम्ही हा मशीन वाटपाचा उपक्रम हाती घेतल्याचे सांगितले.

डॉ. शीतल बोपलकर यांनी बायोमेडिकल वेस्ट करण्याची गरज आहे आणि ते काम या संस्थेने केले आहे. यावेळी पी. टी. पाटील यांनीही मार्गदर्शन केले. प्रास्ताविक मातृभूमी प्रतिष्ठानचे सचिव प्रताप जगदाळे यांनी केले. सूत्रसंचालन किरण गाढवे यांनी केले तर आभार अजित कुंकुलोळ यांनी मानले. कार्यक्रमासाठी संतोष नाईक, शिवराज करळे यांच्यासह मातृभूमी व मेतन फाउंडेशनच्या पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.




## बीएमआयटीमधील विद्यार्थ्यांची बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**सुराज्य/सोलापूर** : जिल्हा क्रीडा अधिकारी सोलापूर कार्यालयामार्फत आयोजित उत्तर सोलापूर तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा १९ वर्षे खालील मुले मुली, योगासन व बुद्धिबळ स्पर्धसाठी ब्रह्मदेवदादा माने कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. बुद्धिबळ स्पर्धा-सलमा शेख, प्रगती सुरवसे, सृष्टी नराळे, सोहम पडवळकर, योगासन-सलमा शेख, राजलक्ष्मी एलगुंडे, आकाश कंदलगावकर, निखिल पवार यांची निवड झाली. संस्थेच्या सचिवा जयश्री माने यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

# युवा महोत्सव दर्जेदार होण्यासाठी तयारीला लागा : डॉ. कांबळे

**सुराज्य/सोलापूर**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा एकोणिसावा युवा महोत्सव हा अतिशय दर्जे दार होण्यासाठी सांस्कृतिक प्रमुखांनी तयारीला लागावे. तसेच विद्यार्थ्यांकडून गुणवत्ताभिमुख अभिनयाचे सादरीकरण करण्यासाठी जोरदार सराव करून घ्यावे, असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. गौतम कांबळे यांनी केले.



शुक्रवारी, दयानंद कला व शास्त्र महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभाग आणि दयानंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने संलग्नित महाविद्यालयातील संस्कृतिक प्रमुखांसाठी आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. कांबळे यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी डॉ. बी. एच. दामजी हे होते. यावेळी व्यासपीठावर तज्ञ प्रशिक्षक डॉ. संजय देवळणकर-पाटील, डॉ. शिरीष आंबेकर, डॉ. राजेंद्र दूरकर आणि भक्ती झळकी यांची उपस्थिती होती. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांनी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक केले.

प्र-कुलगुरू डॉ. कांबळे म्हणाले की, 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये भारतीय ज्ञान, परंपरा आणि संस्कृतीला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. या अनुषंगाने विद्यापीठाचा युवा महोत्सव हा विद्यार्थ्यांसाठी ऊर्जा देणारा आणि व्यक्तिमत्व विकास घडविणारा असतो. त्यामुळे त्यांना व्यासपीठ देणे ही विद्यापीठ व महाविद्यालयाची जबाबदारी आहे. युवा महोत्सवात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सांस्कृतिक प्रमुखांनी शिस्त, संस्काराचे धडे द्यावे. महोत्सवाला गालबोट लागू नये, याविषयी काळजी घेण्यात यावी. चांगल्या प्रकारे तयारी करूनच महोत्सवात उतरावे, असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले.

# शहरात दहा चौकात नो डिजिटल झोन

### आयुक्त तेली उगले यांनी तीन दिवसांचा दिला अल्टिमेट

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील होर्डिंग, फ्लेक्स परवानगी बाबत महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली-उगले यांनी बैठक घेतली होती. या बैठकीत त्यांनी १० ठिकाणी नो डिजिटल झोन जाहीर केले. शहरातील अनधिकृत होर्डिंग ज्या ठिकाणी लावलेले आहेत त्यांनी तीन दिवसाच्या आत काढून घ्यावे अन्यथा सोलापूर महानगरपालिकेच्या मार्फत कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

सोलापूर शहरातील फ्लेक्स प्रिंटिंग असोसिएशन यांची मीटिंग आयुक्तांच्या



दालनामध्ये घेण्यात आली. यावेळी अतिरिक्त आयुक्त निखिल मोरे, उपायुक्त विद्या पोळ, शिवराज झुंजे आदी मान्यवर उपस्थित होते.

सोलापूर शहरात फ्लेक्स डिजिटल लावण्याकरिता लवकरच जागा निश्चिती करून त्याची महानगरपालिकेच्यावतीने प्रसिद्धी करण्यात येईल. प्रिंटर्स असोसिएशन यांनी होर्डिंग फ्लेक्स लावण्याकरिता नागरिकांना मदत करण्याबाबत महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी आवाहन केले. डाक बंगला व सात रस्ता परिसर, रेल्वे स्टेशनपरिसर, भैय्या चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक एस टी स्टॅन्ड, सम्राट चौक, उद्यान परिसर, टिळक चौक परिसर, अशोक चौक परिसर, चार पुतळा परिसर, डफरीन चौक कै. शंकरराव चव्हाण पुतळा परिसर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसर (पार्क चौक) या ठिकाणी नोट डिजिटल झोन म्हणून घोषित करण्यात आले आहेत.

## चौगुले यांचा उद्या भजनाचा कार्यक्रम

**सोलापूर** : शहरातील रहिवासी मल्लिकार्जुन चौगुले यांचे सोमवार दि. ११ रोजी दुपारी ३ ते ६ या वेळेत शिवयोगी सिद्धेश्वर गुरुचरणी भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती मल्लिकार्जुन चौगुले यांनी पत्रकार परिषदेत दिली. हा भजनाचा कार्यक्रम कन्नड व मराठी या दोन्ही भाषेमध्ये सादर होणार आहे. भक्तांनी या भजनाच्या कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन चौगुले यांनी केले आहे.




## साक्षरतेला संवेदनशीलतेची जोड आवश्यक : डॉ. येळेगावकर

### वालचंद महाविद्यालयात जागतिक साक्षरता दिनानिमित्त चर्चासत्र

**सुराज्य/सोलापूर**

'वाचता-लिहिता येणे म्हणजे साक्षरता ही संकल्पना आता कालबाह्य झाली आहे. साक्षरता ही गतिमान बहुआयामी संकल्पना असून तिचा संबंध देशाच्या सर्वांगीण विकासासाठी असतो. आज भारताला राजकीय, सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय, आरोग्य, मोबाईल, डिजिटल अशा विविध प्रकारच्या साक्षरतेची व त्या साक्षरतेला सामाजिक, मानवतेचे भान असलेल्या संवेदनशीलतेची जोड आवश्यक आहे तरच सुजाण, सुसंस्कृत, जबाबदार नागरिक निर्माण होतील आणि भारताला ते सर्वांगीण विकासाच्या दिशेने झेप घेण्यासाठी मदत करतील, असे प्रतिपादन हिराचंद नेमचंद वाचनालयाचे प्रमुख कार्यवाह प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले.'

ते वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय, सोलापूर, समाजकार्य विभाग व एन. एस. एस. युनिट, ल. गो. काकडे एज्युकेशनल फाउंडेशन, सोलापूर व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने वैश्विक साक्षरता दिनानिमित्त वालचंद महाविद्यालयात आयोजित चर्चासत्रात मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी वालचंद कला व विज्ञान महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. मनोहर जोशी हे होते. यावेळी फॅमिली प्लॅनिंगच्या व्हाईस चेअरपर्सन प्रा. डॉ. आयेशा रंगरेज, सदस्य डॉ. विजया महाजन, ल. गो. काकडे एज्युकेशनल फाउंडेशनच्या सचिवा डॉ. नभा काकडे, वालचंद महाविद्यालयाचे एन.एस. एस. विभाग प्रमुख प्रा. डॉ. अमोल शिंदे, डॉ. संगमेश्वर नीला, युवा प्रतिनिधी लक्ष्मण रत्नाकर आदी उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. विजया महाजन यांनी केले. आभार प्रा. डॉ. अमोल शिंदे यांनी मानले तर सूत्रसंचालन सुगतरत्न गायकवाड यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विजय शिंदे, आकाश गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

# जुळे सोलापुरात प्रथमच महिला दहीहंडी जल्लोषात

**माजी आ. दिलीप माने यांचा पुढाकार**

**सुराज्य/सोलापूर**

जुळे-सोलापूर सांस्कृतिक प्रतिष्ठानच्यावतीने प्रथमत: महिला दहीहंडीचे आयोजन केले. गौरव समितीच्यावतीने पाककला स्पर्धेत देखील या भागातील महिला सहभागी झाल्या होत्या. सर्वच क्षेत्रात महिला तरबेज असून त्यांना संधी देणे आवश्यक असून प्रतिष्ठानने एक दहीहंडी सारखा चांगला



उपक्रम केल्याचे माजी आमदार दिलीपराव माने यांनी कौतुक केले.

जुळे सोलापूर सांस्कृतिक प्रतिष्ठानच्यावतीने बंथनाळ मठ प्रांगणात आयोजित केलेल्या दहीहंडी कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी डॉ. शिरीष कुमठेकर, डॉ. पृथ्वीराज माने, जयश्री माने, मयुरा माने, जयंत कोकाटे, डॉ. रवी मेंगजी, डॉ. प्रिया मेंगजी, डॉ. अभिजीत शहा, डॉ. संजू माळी, जयश्री मेलगे, रोहिणी देशपांडे, श्रीकांत मेलगे-पाटील, डॉ. सचिन कुलकर्णी, सुषमा हिबारे, आनंद पाटेकर, महादेव सोनकांबळे, सुधाकर कटारे, मेघा डांगेसह मान्यवर उपस्थित होते. यावेळी महिला दहीहंडीसाठी संस्कृती पुणेकर व पुरुष दहीहंडीसाठी ओम पाटील यांना मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले. माने यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## ए.जी. पाटील महाविद्यालयात पोषण सप्ताह साजरा

**सोलापूर** : ए.जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात १ सप्टेंबर ते ७ सप्टेंबर हा पहिला आठवडा पोषण सप्ताह साजरा करण्यात आला. जीवनसत्वे, प्रथिने आदी पोषण तत्वांचा आहार निरोगी आरोग्यासाठी किती चांगला वापर होतो याविषयी आहार तज्ज्ञ सौ रूपाली कोरे यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थी दशेतील सध्याचा टप्पा हा आयुष्याची दिशा ठरवत असतो व त्यासाठी सदृढ निरोगी आरोग्याचे महत्त्व त्यांनी समजावून दिले. सुदृढ आरोग्यासाठी आपली दिनचर्या व त्यासोबत योग्य आहार, पाणी तसेच नियमित व्यायाम यावर मुलींनी भर द्यावा असे आवाहन त्यांनी केले. संस्थेचे सचिव श्री एस. ए. पाटील, कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांनी आहार तज्ञ सौ रुपाली कोरे यांचे स्वागत केले. सूत्रसंचालन कुमारी ऋतुजा कदम हिने केले हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संगिनी समन्वय प्रा. आर.डी. मुदगुंडी व प्रा.टी.डी. मसलेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.



## रोल बॉल स्पर्धेमध्ये सिंहगड पब्लिक स्कूलचे यश

**सोलापूर** : राजीव गांधी स्टेडियम सोलापूर येथे झालेल्या १७ वर्षाखालील मुलांच्या जिल्हास्तरीय शालेय रोल बॉल स्पर्धेमध्ये सिंहगड पब्लिक स्कूल ने चांगली कामगिरी करून प्रथम क्रमांक पटकावला. हा संघ विभागीय स्पर्धेसाठी पात्र झालेला आहे.

सर्व विद्यार्थ्यांना संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांचे प्रोत्साहन लाभले तसेच शाळेच्या प्राचार्या निखत शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या सर्व विजयी खेळाडूंना क्रीडा शिक्षिका स्वप्नजा आराध्ये, सीमा मादगुंडी, प्रशांत जाधव व अजित कट्टे यांचे मार्गदर्शन लाभले.

## गुटखा, मावा विक्रीप्रकरणी दहा जणांची निर्दोष मुक्तता

**सोलापूर** : सोलापूर येथील आसरा चौकातील तिरंगा पान शॉप व मामू पान शॉपवर दि.१५ ऑक्टोंबर २०२० रोजी अन्न व औषध प्रशासन विभाग व विजापूर नाका पोलीसांनी संयुक्तिक कारवाई करून गुटखा व मावा विक्रीप्रकरणी एकूण दहा जणांविरुध्द गुन्हा दाखल केला होता.या गुन्ह्यातील सर्व आरोपींची जिल्हा व सत्र न्यायाधीश रेखा पांढरे यांनी निर्दोष मुक्तता केली. आसरा चौकातील मामू पान शॉप व तिरंगा पान शॉप येथे अवैधरित्या गुटखा व मावा विक्री करत असताना अन्न व औषधे प्रशासन विभाग व विजापूर नाका पोलिसांनी संयुक्तिक कारवाई करून तिरंगा पान शॉपमधून एकूण ५ हजार रुपये व मामू पान शॉपमधून ११ हजार १८० रुपयांचा साठा जप्त केला होता.

तसेच,तिरंगा पान शॉपमधील सहा संशयित आरोपींना व मामू पान शॉपमधील चार आरोपींना अटक करून पोलीस नाईक खांडेकर यांनी तपास करुन आरोपींविरुध्द सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते.याप्रकरणाची जिल्हा व सत्र न्यायाधीश रेखा पांढरे यांच्यासमोर सुनावणी होऊन एकूण तीन साक्षीदार तपासण्यात आले. सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली.यात सरकारपक्षातर्फे ॲड. दत्तुसिंग पवार यांनी तर आरोपींतर्फे ॲड. अभिषेक गुंड आणि ॲड. मनोहर गोविंदे यांनी काम पाहिले.

## सासऱ्याच्या शेतात जावयाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर** : सोलापूर -सासर्याच्या शेतात जावयाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना विजापूर रोडवरील प्रताप नगरात शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली. संतोष श्रीमंत चाबुकस्वार (वय २५ रा. माळीगल्ली,सोरेगाव) असे मयताचे नाव आहे. काल सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह प्रतापनगर येथील कडप्पा कोटीवाले (सासरे) यांच्या शेतातील पत्रा शेडमध्ये असलेल्या लोखंडी अँगलला दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. मयत संतोष चाबुकस्वार हा सैफुल परिसरात पान टपरीचा व्यवसाय करीत होता. त्याच्या पश्चात पत्नी आणि लहान मुलगी असा परिवार आहे. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार घुगे पुढील तपास करीत आहेत.

# हक्काच्या घरासोबत मुलींना उडण्यासाठी त्यांच्या पंखांना बळ द्या

**सुराज्य/सोलापूर**



रे नगर गृहनिर्माण प्रकल्पा अंतर्गत लाभार्थ्यांना हक्काचे घर मिळत आहे. या घरांसोबत महिलांचे सक्षमीकरण व त्यांच्यातील अंगभूत कलागुण व कौशल्याचे विकास यावर भर देणे काळाची गरज आहे. ज्या घरात मुलगी शिकेल ते घर सर्वांगीण विकास साधेल. म्हणून आपण मुलींना उडण्यासाठी पंखांना बळ द्या, असा आशावाद राज्याचे गृहनिर्माण मंत्रालयाचे अप्पर मुख्य सचिव वलसा नायर यांनी व्यक्त केला.

देशातील एकमेव असा सोलापूरच्या ३० हजार असंघटित कामगारांचा महत्वाकांक्षी व पथदर्शी गृहनिर्माण प्रकल्प रे नगर चे काम युद्धपातळीवर पूर्णत्वास येण्यासाठी पंतप्रधान आवास योजना कार्यालयाकडून वेगवान हालचाली सुरू असून नोव्हेंबर मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वितरीत करण्यात येणाऱ्या रे नगर घरकुलांच्या प्रगतीचा आढावा नायर यांनी घेतला, त्यावेळी त्या बोलत होत्या. त्यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार दि. ९ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता रे नगर कुंभारी येथे बैठक पार पडली.

यावेळी व्यासपीठावर प्रकल्पाचे मुख्यप्रवर्तक तथा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मा. मनीषा आव्हाळे, गृहनिर्माण विभाग उपसचिव मा. अजित कवडे, उपजिल्हाधिकारी मा. विठ्ठल उदमळे, अवर सचिव गृहनिर्माण मा. रवींद्र खेटले, पंतप्रधान आवास योजना समन्वयक मा. मुकुल बापट, मा. मुख्य अधिकारी पुणे म्हाडा अशोक पाटील, रे नगर फेडरेशनचे चेअरमन कॉ. नलिनीताई कलबुर्गी, सचिव कॉ. युसुफ शेख (मेजर), मा.नगरसेविका कॉ. कामिनिताई आडम, कार्यकारी अभियंता एम.जी.पी. मा. प्रवीण पाटील, कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग नरेंद्र खराडे, मंत्रालय कक्षअधिकारी राजू अंबाडेकर, म्हाडा उपअभियंता मिलिंद अटकळे, महा हौसिंगचे कानेटकर साहेब, कार्यकरी अभियंता म्हाडा मा. वैभव केदारे, विकासक मा. अंकुर पंधे आदी उपस्थित होते.

यावेळी फेडरेशनचे चेअरमन कॉ. नलिनीताई यांनी स्वागत केले. सचिव कॉ. युसुफ शेख (मेजर) यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन कॉ. ॲड.अनिल वासम यांनी केले.

यावेळी रे नगर को ऑपरेटिव्ह सोसायटी फेडरेशन चे सर्व पदाधिकारी व संचालक मंडळ , मेहुल मुळे व माकप चे सचिव मंडळ सदस्य नसीमा शेख, व्यंकटेश कोंगारी, शेवंता देशमुख,सुनंदा बल्ला, कुरमय्या म्हेत्रे, रंगप्पा मरेड्डी, म.हनिफ सातखेड, सलीम मुल्ला, मुरलीधर सुंचू, बापू साबळे, शकुंतला पानिभाते,लिंगवा सोलापूरे, दत्ता चव्हाण यांच्यासह जिल्हा समिती सदस्य यांची उपस्थिती होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संदीप झाकणे, दाउद शेख, वीरेंद्र पद्मा, विक्रम कलबुर्गी, विल्यम ससाणे, नरेश दुगाणे, जावेद सगरी, जुबेर सगरी, बाळकृष्ण मल्याळ, अभिजित निकंबे, विजय हरसुरे, राजेश काशीद, हुसेन शेख, खाजाभाई करजगी, रफिक नदाफ, नितीन कोळेकर, नितीन गुंजे, बजरंग गायकवाड, नागेश म्हेत्रे, सिद्राम गडगी,बालाजी गुंडे, शिवा श्रीराम, किशोर गुंडला, प्रवीण आडम, बालराज म्हेत्रे, मोहन कोक्कूल, पांडुरंग म्हेत्रे, विजय मरेड्डी, अंबादास बिंगी, प्रशांत चौगुले, गंगाराम निंबाळकर, अस्लम शेख, अमीन शेख, फेरोज शेख, हरीश पवार, शाम आडम, आदींनी परिश्रम घेतले.

# माढा विधानसभा मतदारसंघातील रस्त्यासाठी १० कोटींचा निधी द्यावा : आ. रणजितसिंह

**सुराज्य/सोलापूर**



माढा विधानसभा मतदार संघात माढा, पंढरपूर व माळशिरस तालुक्यातील गावांचा समावेश असून सदर गावातील ग्रामीण रस्त्यांची दुरुस्ती व विकास कामे होणे आवश्यक असल्याने आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन प्रस्तावित कामांना १० कोटी रूपयांचा निधी उपलब्ध व्हावा अशी मागणी केली. माढा तालुक्यातील परिते, तुळशी, सापटणे, बैरागवाडी, आरण, टाकळी, आहेरगाव, घोटी, भुताष्टे, भेंड, परितेवाडी, उजनी, वरवडे, रुई,गाराकोले, मोडनिंब, तांबवे, चिंचोली ,लऊळ, विठ्ठलवाडी, शेवरे, लोंढेवाढी पंढरपूर तालुक्यातील सुस्ते, देगाव, रोपळे, तुंगत, आव्हे, व्होळे, बिटरगाव, जाधववाडी, नांदोरे, बाभूळगाव, जळोली,करकंब, खरातवाडी माळशिरस तालुक्यातील उंबरे (वे),मिरे, वाघोली,लवंग,वाफेगाव,कोंढारपट्टा,जांभूड,विठ्ठलवाडी, बोरगाव, नेवरे खळवे या माढा विधानसभा मतदारसंघातील या तीन तालुक्यातील गावामध्ये मुलभूत ग्रामीण रस्ते विकास व दळणवळण सुविधा निर्माण व्हाव्यात या करीता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी मुंबईत भेट घेत १० कोटी रुपयांच्या निधीची मागणी केली यावर फडणवीस यांनी संबंधित विभागातील अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या

## दोघा शेतकऱ्यांची सालगड्याने केली फसवणूक

**सुराज्य/सोलापूर**

दोन शेतकऱ्याकडून उचल घेऊन सालगड्याने दोघांनाही जवळपास ८० हजार रुपयाची टोपी घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.मोहोळ तालुक्यातील विरवडे बुद्रुक येथील उमेश वामन अवताडे (वय-३९,रा. मु.पो.विरवडे,मोहोळ) यांनी महादेव रोकडे (रा.कुंभारी,सोलापूर) यास आपल्या शेतात सालगडी म्हणून ठेवले.त्या बदल्यात आरोपी महादेव रोकडे यांनी शेतकरी उमेश अवताडे यांचा विश्वास संपादन करून इसारा म्हणून २ हजार १०० रुपये घर कामासाठी व ३७ हजार तसेच इतर कामासाठी ३ हजार असे एकूण ४२ घेऊन कामावर न येता फसवणूक केली.

तर दुसऱ्या घटनेत याच आरोपीने महादेव रोकडे यांनी राजसिंह विठ्ठल जाधव (वय-३६,रा.कुमठे.तालुका उत्तर सोलापूर) या शेतकऱ्यांकडे सालगडी राहतो म्हणून रोख स्वरूपात ३६ आणि कुलकर्णी तांडा येथील शेतात ५०० रुपये असे एकूण ३६ हजार ५०० रुपये घेऊन कामावर न येता पोबारा केला.आपली फसवणूक झाल्यानंतर दोघा शेतकऱ्यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात संशयित आरोपी महादेव रोकडे याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास मसपोनि.भांबिष्टे व पोसई माळी करत आहेत.

## आज सुशील कुलकर्णी यांचे व्याख्यान

**सोलापूर** : श्री. सोलापूर गुजराती मित्र मंडळाव्दारे प्रतीवर्षाप्रमाणे यंदा रविवार १० सप्टेंबर रोजी मंडळाचे माजी ट्रस्टी स्व. अरविंदभाई जव्हेरी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ व्याख्यनमालेचे आयोजन होत आहे.

यंदा मराठीत औरंगाबादचे श्री. सुशील कुलकर्णी यांचे धर्म नव्हे राष्ट्रधर्म या विषयावर सायं. ६.३० वाजता व्याख्यान संपन्न होणार असून तत्पूर्वी दु. ४.०० वा गुजरातीत मुंबई येथील प्रसीध्द गुजराती चित्रपट पटकथा लेखक, दिग्दर्शक संजय छेल यांचे हिंदी सिनेसृष्टीत गुजरातींचे योगदान या विषयावर गुजरातीतून व्याख्यान होईल. हे दोन्ही व्याख्यान कल्पना टॉकीजजवळील गुजरात भवनच्या वातानुकुलीत हॉल मध्ये संपन्न होणार आहे.

## जन्माष्टमीनिमित्त कारंब्यात ज्ञानेश्वरी पारायण सप्ताह

**सुराज्य/उ. सोलापूर**

कारंबा येथे हनुमान मंदिरामध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त ह भ प अभिमान पाटील महाराज कोंडी यांची भागवत कथा व किर्तन सप्ताह ३१ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर या कालावधीमध्ये सप्ताह संपन्न झाला.

दैनंदिन पहाटे काकडा आरती, ज्ञानेश्वरी पारायण, तुकाराम गाथा, भजन, पोथी, पारायण, हरी जागर असे विविध कार्यक्रम साजरे करण्यात आले. गुलालचे किर्तन लक्ष्मण महाराज सुतार कारंबा, काल्याचे किर्तन अभिमान पाटील महाराज कोंडी यांनी केले. गावातील महिलांनी पाळणा म्हणून जनमष्ठमी साजरी करण्यात आली.ग्रामस्थाच्या वतीने महाप्रसाद वाटप करण्यात आले. दादासाहेब काशीद, राम भोरे, धनाजी गायकवाड, हनुमंत भोरे, अभिनंदन गायकवाड, सनातन गिरे, धोंडू भुट्टे, तानाजी कांबळे, राम सुपेकर, बळी जावळे, नागनाथ शिरसागर, प्रभाकर भोरे, संजय सुतार, विक्रम माने, केदारनाथ बहिर्जी, भागवत कत्ते, महेश पेंडपाले व भजनी मंडळातील यांनी परिश्रम घेतले.

# शिक्षकांच्या योगदानामुळेच समाज व विद्यार्थ्यांची प्रगती : डॉ. पिरजादा

**सुराज्य/सोलापूर**



शिक्षकांना समाजामध्ये आदराचे स्थान असुन त्यांच्या योगदानामुळेच विद्यार्थ्यांची प्रगती होत असते, ते केवळ विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे काम करीत नाहीत तर त्यांचे जिवन घडविण्याचे काम करीत असतात असे गौरव उद्गार गुलबर्गा येथील डॉ.फहिमोद्दीन पिरजादा यानी काढले.

अखिल भारतीय उर्दू साहित्य समितीच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त शिक्षण क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केलेल्या शिक्षक व मुख्याध्यापकांच्या गौरव समारंभाच्या अध्यक्षस्थानावरुन त्याबोलत होते. उर्दू हि गोड भाषा असुन सर्व समाजाची आहे, ती टिकली व वाढली पाहिजे. एकमेकांनी विविध भाषा आत्मसात केल्यास जिव्हाळा निर्माण होतो. असे मत ही त्यांनी यावेळी व्यक्त केले.

अ.भा.उर्दू साहित्य समितीतर्फे शिक्षक दिनाचे औचित्य साधुन शहरातील उर्दू प्राथमिक व माध्यमिक शाळेतील आठ मुख्याध्यापक ,चार प्राध्यापक ,दोन तर एक क्रिडा शिक्षक अश्या चौदा अध्यापन करणाऱ्या गुरुजनांचा गौरव करण्यात आला. पुरस्कार प्राप्त अर्जुमन औसेकर व शाहिन बिजापूरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविकप्रा.रियाज वळसंगकर यांनी केले तर माजी महापौर तथा संस्थेचे अध्यक्ष ॲड.यु. एन.बेरिया यांनी उर्दू दिनाचे महत्व सांगितले या कार्यक्रमास संस्थेचे सचिव अखलाक शेख, विकार शेख, रफिक खान, नसीर आळंदकर, म.हुसेन बक्षी सर, जावीद उस्ताद, इक्बाल शेख, हारुण बंदुकवाला, रफीक नल्लामंदु हजर होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्राध्यापक अशफाक सातखेड यांनी केले तर अय्युब नल्लामंदु यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

### यांचा झाला गौरव

अर्जुमंद अली मजहर अवसेकर, साजिदा शमशोद्दिन शेख,बाबासाहेब धाबेकर, रेहाना मुसा शेख, अब्दुल्लाह म.शरीफ पानगल, नजीर अहमद इब्राहिम मुल्ला, यास्मीन इक्बाल शेख, गुलाम वस्तानवी, शाहिन अ.मन्नान बिजापूरे, मुश्ताक अहमद इस्माईल गदवाल, इम्रान कासिम जमादार,मेहजबीन नबीसाहेब मुल्ला, अ.कादर सैफनमुलुक करजगी,सय्यदा जवेरीया शकील इनामदार,आफरीन मुर्तुजा,म.अलीम म.हुसेन शेख

## पावसाळी नाले बांधण्यासाठी शासनाकडून महापालिकेला ९७ कोटी मंजूर

**सुराज्य/सोलापूर**

शहरातील पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी खुले नाले नव्याने बांधण्यासाठी शासनाने महापालिकेला ९७ कोटी २२ लाख रुपये मंजूर केले आहेत.



शासनाच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत १५० कोटी ९७ लाख रुपये निधी मिळण्यासाठी महापालिका आयुक्त शीतल तेली उगले यांनी प्रस्ताव पाठवला होता. प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच या अभियानांतर्गत राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समितीची बैठक पार पडली. या बैठकीत महापालिका आयुक्तांनी पावसाळी नाले बांधण्याची गरज सागून निधीची मागणी केली. पाऊस पडल्यानंतर शहरातील अनेक भागात पाणी रस्त्यावर साचुन राहते त्यामुळे वाहतुकीचा खोळंबा होतो. याशिवाय पावसाचे पाणी अनेकांच्या घरात शिरते त्यामुळेदेखील मोठे नुकसान होते. गरीब लोकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. ही अडचण दूर होण्यासाठी शहरात खुले नाले नव्याने बांधण्याची गरज आहे. दोन टप्प्यात हे काम करण्यात येणार असून पहिल्या टप्प्यातील कामासाठी शासनाने ९७ कोटी २२ लाख मंजुर केले आहेत. या निधीतून जुना पुणे नाका, हैदराबाद रोड, शरदचंद्र प्रशाला, उमानगरी, अक्कलकोट रोड यासह इतर ठिकाणी हे नाले बांधण्यात येतील. हे काम झाल्यानंतर पावसाचे पाणी साचणार नाही.

# मागण्यांची पूर्तता करण्याचे लेखी आश्वासन; आंदोलन स्थगित

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूर जिल्हा परिषदेतील माध्यमिक शिक्षण शिक्षण विभागातील मागील चार दिवसापासून विविध मागण्याच्या संदर्भात सुरू असलेले शिक्षकांचे उपोषण आज शुक्रवारी मागे घेण्यात आले.

मागील तीन-चार दिवसापासून शिक्षकांचे विविध मागण्यासाठी सुरू असलेले उपोषण जिल्हा प्रशासनाने शुक्रवारी लेखी आश्वासन दिल्याने दिनांक २१ सप्टेंबर पर्यंत मागे घेण्यात आले. २१ सप्टेंबर पर्यंत मागण्या मान्य न झाल्यास पुन्हा आमचे आंदोलन असेच सुरू राहणार असल्या शिक्षण संघटनेने म्हटले आहे. भ्रष्टाचार, दप्तर दिरंगाई, प्रलंबित विषयाविरोधात शिक्षक दिनापासून शिक्षक भारती संघटनेच्या वतीने जिल्हा परिषदेसमोर आमरण उपोषण करण्यात येत आहे. शिक्षकांची कामे करण्यासाठी पैसे मागणाऱ्या लिपिकावर जोपर्यंत कारवाई होत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेण्यात येणार नसल्याचे शिक्षक भारती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी निर्धार केला होता .



सोलापूर माध्यमिक शिक्षण विभागात टप्पा अनुदानातील शिक्षकांच्या शालार्थ आयडी चा प्रश्न गंभीर बनला आहे. अशात कार्यालयीन कामासाठी पैशाची मागणी करणारे कनिष्ठ सहायक संजय बाणूर यांच्यावर कारवाई करा, वैद्यकीय बिले व थकीत फरकाबाबतची चौकशी करा, प्रलंबित सर्व अनुकंपा तत्त्वावरील नोकर भरतीचा प्राधान्याने विचार करा या मागणीसाठी शिक्षक भारतीचे पदाधिकारी उपोषणाला बसले आहेत.

तत्कालीन सीइओनी बाणूर यांना समाजकल्याणचा अतिरिक्त पदभार दिला होता पण बानूर समाज कल्याणला गेलेच नाहीत पुन्हा त्यांना माध्यमिक शिक्षण विभागाकडे ठेवण्यात आले. दरम्यान सीईओ म्हणून मनीषा आव्हाळे यांनी पदभार घेतला त्यांनी प्रतिनियुक्त असणाऱ्यांना त्यांच्या मूळ ठिकाणी पाठविले आहे त्यात बानोर प्राथमिकला गेले आहेत.

तरीही त्यांचा हस्तक्षेप सुरूच असल्याचा आरोप शिक्षकांमधून होत आहे. त्यामुळे बाणूर यांना माळशिरस किंवा अन्य ठिकाणी पाठवा अशी मागणी भारती शिक्षक संघटनेने केली होती.

### बाणुरांची चौकशी करण्याची मागणी

सुजितकुमार काटमोरे यांनी बानूर यांच्या कारभाराची चौकशी करण्याची मागणी केली होती.जिल्हा परिषदेसमोर उपोषणाला बसलेल्या शिक्षक भारती संघटनेचे पदाधिकारी व शिक्षकवृंदाशी शिक्षणाधिकाऱ्यांनी चर्चा करून वरील प्रमाणे निर्णय घेण्यात आला .या आंदोलनात शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष सुजितकुमार काटमोरे, कार्याध्यक्ष शशिकांत पाटील, करमाळा तालुकाध्यक्ष विजयकुमार गुंड तर सहकुटुंब बसणारे शिक्षक मायप्पा हाके, यास्मीन अन्सारी, शरद पवार, नौशाद सय्यद यांच्यासह अन्य शिक्षकांचा समावेश होता .



## जीवनात संघर्षातूनच यश मिळते : आ. कल्याणशेट्टी

**सुराज्य/अक्कलकोट**

जीवनात यशस्वी होण्यासाठी जिध्द,चिकाटी व परिश्रमाची गरज आहे.सतत प्रयत्न करत असताना अनुभव तुम्हाला यशाचा मार्ग दाखवुन देतो. तुम्हाला संघर्षातुनच यश मिळेल, असे प्रतिपादन अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले,पंचायत समिती अक्कलकोट येथे तालुकास्तरीय पावसाळी क्रीडा स्पर्धेच्या पारितोषिक वितरण प्रसंगी आमदार कल्याणशेट्टी बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटविकासाधिकारी मा.सचिन खुडे होते.व्यासपीठांवर गटशिक्षणाधिकारी सौ.कुदसिया शेख, भाजप तालुकाध्यक्ष मोतिराम राठोड, श्रीमंत कोळेकर आदी मान्यवर उपस्थित होते.विवेकानंद प्रतिष्ठानकडुन १४,१७,१९ मुले व मुली वयोगटातील सांघिक व वैयक्तिक खेळातील प्रथम,व्दितीय व तृतीय क्रमांक मिळवलेल्या खेळाडुंना ट्रॉफि व मेडल देऊन गौरवण्यात आले.

कार्यक्रमासाठी पुढंलिक कलखांबकर,अमोल कोकाटे,परमेश्वर व्हसुरे,दयानंद उटगे,दत्तात्रय हिळ्ळी,प्रकाश सोनटक्के,बाबु पवार,अविनाश राठोड,परमेश्वर पाटील यांनी परिश्रम घेतले.

# क्रीडा हा सर्वांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग : गायकवाड

सुराज्य/श्रीपूर




क्रीडा हा सर्वांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. या खेळामुळेच आपल्या मनातील शरीरातील चंचलता टिकून राहते ती टिकून राहण्यासाठी चेअरमन प्रशांतराव परिचारक यांच्या वाढदिवसानिमित्त पांडुरंग कारखान्याच्या वतीने डॉ यशवंतराव कुलकर्णी यांनी प्रशांत क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले आहे. पराजित कामगार खेळाडूंनाही पुढील काळात निश्चित तुम्ही यश मिळवतील, अशा शुभेच्छा देत कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांना वाढदिवसाच्या अकलूज पोलीस निरीक्षक दीपरतन गायकवाड यांनी दिल्या.

श्रीपुर येथे कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना यांच्या वतीने कारखानास्थळावर कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या पाचव्या प्रशांत क्रीडा महोत्सवाच्या बक्षीस वितरण समारंभाच्या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अकलूज पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दीपरतन गायकवाड, व्हा.चेअरमन कैलासराव खुळे, संचालक तानाजी वाघमोडे, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी, डॉ दादासाहेब पराडे पाटील, शिवकुमार मदभावी, प्रोसेस मॅनेजर मुकंद कुलकर्णी, लेखपाल रविंद्र काकडे, केन मॅनेजर संतोष कुमठेकर डिस्टलरी मॅनेजर एस आर पाटील डेप्युटी चीफ इंजिनियर अमोल बारटक्के , ऊस विकास अधिकारी सोमनाथ भालेकर, टाईम कीपर सोपान कदम, मटेरियल मॅनेजर एम जे देशपांडे, अनंत कुलकर्णी, समीर सय्यद वैद्यकीय अधिकारी डॉ. सुधीर पोफळे, डॉ प्रमोद पवार, क्रीडा समिती अध्यक्ष सचिन विभुते, उपाध्यक्ष तानाजी भोसले, भीमराव बाबर सिव्हिल विभाग प्रमुख हनुमंत नागणे, युनियनचे प्रतिनिधी विजय पाटील, अनंत जाधव व्यासपीठावर उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी केले. यावेळी कारखान्याचे व्हाईस चेअरमन खुळे यांनी कारखान्याचे संचालक मंडळ यांच्या वतीने डॉ. यशवंत कुलकर्णी, अधिकारी वर्गाचे आभार मानले.

**विविध स्पर्धात यश मिळवलेले संघ** -: आट्यापाट्या स्पर्धा प्रथम क्रमांक- शेती अ, द्वितीय क्रमांक इंजिनिअरिंग, बेस्ट प्लेयर तानाजी गायकवाड, बेस्ट सुरकरी अविनाश सप्ताळ, व्हॉलीबॉल स्पर्धा प्रथम क्रमांक एमडी सेवन स्टार, द्वितीय क्रमांक इंजिनिअरिंग, मॅन ऑफ द सिरीज प्रतीक खटके, बेस्ट नेटमन बाळासाहेब वाघमारे, रस्सीखेच स्पर्धा प्रथम क्रमांक बॉयलर अ, द्वितीय क्रमांक शेती विभाग, क्रिकेट स्पर्धा प्रथम क्रमांक डॉक्टर सुधीर पोफळे यांचा रॉयल चॅलेंजर पांडुरंग, द्वितीय क्रमांक तानाजी भोसले यांचा पांडुरंग इंडियन, मॅन ऑफ द सिरीज डॉ. प्रमोद पवार, बेस्ट बॉलर अक्षय काळे, बेस्ट बॅट्समन सचिन मांगले, बेस्ट विकेटकीपर विश्वनाथ कानगुडे, मॅन ऑफ द मॅच सचिन झुंजारे, बेस्ट कॅच मारुती सुरवसे, उत्कृष्ट क्षेत्ररक्षण अभिमन्यू चव्हाण.

विजेत्या संघांना पो.नि. गायकवाड, व्हा. चेअरमन खुळे, कार्यकारी संचालक डॉ. कुलकर्णी, संचालक वाघमोडे यांच्या हस्ते गौरवण्यात आला. समालोचन करणारे दीपक मंडले पुणे आणि इर्शाद बागवान यांचाही सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन डॉ. सुधीर पोफळे यांनी केले.



## रासपच्यावतीने पंकजा मुंडे यांचे मैंदर्गी येथे स्वागत

**अक्कलकोट** : भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव पंकजा ताई मुंडे यांचे मैंदर्गी (ता. अक्कलकोट) येथे राष्ट्रीय समाज पक्षाच्या अक्कलकोट तालुक्याच्या वतीने महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनिल दादा बंडगर यांच्या नेतृत्वाखाली जेसीबीच्या सहाय्याने पुष्पवृष्टी करुन जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी सोलापूर जिल्हा सरचिटणीस सुरेश गुत्तेदार, दत्तात्रय माडकर, युवक आघाडीचे तालुकाध्यक्ष दाजी कोळेकर, तालुका उपाध्यक्ष विलास पाटील, तालुका कार्याध्यक्ष काशिनाथ निंबाळ, संतोष शिंदे, कृष्णा कोटी, विशाल निंबाळ, रेवणसिध्द शेरी, विठ्ठल सुरवसे,कृष्णा निंबाळ,बिरप्पा मिरजगी, महेश झळकी,राजू पाटील देवा हिळळी, गजानन हिळळी यांच्या सह आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते..



## अतिक्रमण नियमीत करण्याची मागणी

**नातेपुते** : नातेपुते, अकलुज, महाळुंग, माळशिरस नगरपंचायतीकडे अतिक्रमण नियामाकुल करण्यासंदर्भात तेथील रहिवासी यांनी अर्ज सादर केले आहेत. समितीच्या बैठकीची आयोजन करून संबधींताना आदेश द्यावेत, असे निवेदन माळशिरस तालुका शिवसेना प्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांनी अकलूज उपविभागीय अधिकारी टिळेकर यांना दिले.

शासन आपल्या दारी ही योजना संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात येत आहे. या योजनेमध्ये अर्ज केलेल्या नागरिकांना त्यांची घरे नियमित करण्यासंदर्भात मोजणी होणे आवश्यक आहे. तरी वरील तात्काळ मोजणी करण्यात यावी, असे हिवरकर यांनी म्हटले आहे. यावेळी टिळेकर यांचा सन्मान करण्यात आला.

## हॅण्डल लॉक केलेली दुचाकी पळवली

**सोलापूर** : हॅण्डल लॉक केलेली दुचाकी क्र.एमएच.१३.बीएच.०२५९ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना दि.८ सप्टेंबर २०२३ रोजी दुपारी एक ते दीड




वाजण्याच्या दरम्यान होटगीकर लाकूड अड्डा बाराईमाम चौक येथे घडली.याप्रकरणी विकास अहमद नन्नूभाई होटगीकर (वय-६०,रा.सोमवार पेठ) यांनी जरूर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस नाईक माने हे करीत आहे.

# खंडाळी दत्तनगरच्या महिलांनी केले धार्मिक पर्यटन

सुराज्य/वेळापूर

दत्तनगर खंडाळी येथील ८५ महिलांनी राज्य परिवहन महामंडळाच्या श्रावण महिन्यातील विशेष बस सेवेचा लाभ घेऊन गाणगापूर येथे श्री दत्त महाराजांचे, अक्कलकोट येथे स्वामी समर्थांचे तसेचसोलापूर येथे सिद्धरामेश्वराचे दर्शन घेतले. या दर्शनयात्रेचे नियोजन भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा माळशिरस तालुका सरचिटणीस विनोद थिटे यांच्या माध्यमातून करण्यात आले.



या धार्मिक वारीमध्ये दत्तनगरच्या ८५ महिलांनी एसटीच्या दोन लाल परीतुन सहभाग नोंदवला. सकाळी सहा वाजता चालू झालेला प्रवास संध्याकाळी एक वाजता संपला. यावेळी राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने चालक म्हणून आबा गोसावी व खंडोबा गायकवाड यांनी सर्व महिलांना सुरक्षितरित्या प्रवास घडवला. या दर्शनयात्रेत सारिका पवार, नूतन शिंदे, मंदाकिनी काळे, सविता पवार, सविता सगट, सुशीला पताळे, साधना थिटे, पायल खुळे, विजया पवार, मेघा वाघमारे, स्वप्नाली पवार, मंगल पवार, अश्विनी गायकवाड, सरस्वती भोसले, अंजली पवार, केशर भिसे, राणी जगताप, अनुसया मोरे, अश्विनी निंबाळकर, वैजयंता काळेल,बाळाबाई खंडागळे यांच्यासह अनेक महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. हे धार्मिक पर्यटन घडवण्यासाठी राज्य परिवहन अकलूज आगाराचे आगार व्यवस्थापक प्रमोद शिंदे,वाहतूक निरीक्षक सोनवलकर,वाहतूक नियंत्रक रंदवे ,राजू गोसावी व मालवाहतूक नियंत्रक लंगोटे यांचे सहकार्य लाभले.

## बालविकास मंदिर येथे दहीहंडी कार्यक्रम

**माळीनगर** : येथील बालविकास मंदीर या शाळेत श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त दहीहंडी गोपाळकाला कार्यक्रम झाला. शिवांस माने, रितेश ओहाळ, श्रवण देशमाने, आरूष चवरे, राजवीर भोसले या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण वेशभूषा केली होती. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका संगीता भालेराव, शिक्षिका रजनी इनामके, रूपाली शिंदे, लक्ष्मी जाधव आदींनी परिश्रम घेतले.

### कर्देहळ्ळी येथे युवकाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर** : कर्देहळ्ळी (ता. दक्षिण सोलापूर) येथे राहणाऱ्या सुरज शैलेश मोरे (वय-२५) याने राहत्या घरात विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना गुरुवारी दुपारच्या सुमारात घडली. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# चपळगाव येथे सकल मराठा समाजाच्या वतीने रास्ता रोको

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट तालुक्यातील चपळगाव येथे चपळगाव व बावकरवाडी येथील सकल मराठा समाजाच्या वतीने रास्ता रोको करून निदर्शने करण्यात आली.



जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील अंतरवाली सराटी या गावात मराठा समाजाच्या वतीने मराठा आरक्षणासाठी आंदोलन सुरू होते. त्याप्रसंगी झालेल्या लाठीचार्ज प्रकरणी चपळगाव येथे निषेध म्हणून रास्ता रोको करून निदर्शने करण्यात आले. याप्रसंगी नायब तहसीलदार विकास पवार व पोलीस उपनिरीक्षक महेश भावीकट्टी यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी ज्येष्ठ नेते अंबणप्पा भंगे, अक्कलकोट मार्केट कमिटी उपसभापती आप्पासाहेब पाटील, ज्येष्ठ नेते नंदकुमार पाटील, शिवजन्मोत्सव प्रतिष्ठानचे अध्यक्ष मनोज इंगोले, यांच्यासह लक्ष्मण जाधव, भगवान जाधव, गुंडा चव्हाण, सुरेश इंगोले, मल्लिनाथ सोनार, गोकुळ मोरे, संतोष मोरे, श्रीमंत इंगोले, केतन सुरवसे, प्रदीप सुरवसे, प्रकाश सुरवसे, सुरेश सुरवसे, अविनाश कदम, गुलाब बानेगाव, भीमाशंकर दुलंगे, संगप्पा अंबारे, दीपक कांबळे, तमा गजधाने, गंगाराम भोसले, आकाश सुरवसे, रमेश शिंदे, श्रीमंत सोनार, मच्छिंद्र सुरवसे, मारुती शिंदे, शिवानंद जकापुरे, राजकुमार भंगे, घाळप्पा सराटे, अखिल कवठेकर, बसवराज बनजगोळ हनुमंत तोळणूरे खंडू कोरे विजय बिराजदार, संतोष मोरे, श्रीमंत इंगोले, योगेश मोरे, आकाश इंगोल आदी उपस्थित होते. याप्रसंगी पोलीस पाटील विवेकानंद हिरेमठ यांच्यासह मोठा पोलीस बंदोबस्त होता.

# विशेष मोहिमेतर्गंत तब्बल २५८ प्रकरणांचा निपटारा

सुराज्य/पंढरपूर

पंढरपूर जिल्हा न्यायालयामध्ये दिनांक ९ सप्टेंबर, २०२३ रोजी आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीच्या अनुषंगाने दिनांक ४ ते ८ सप्टेंबर, २०२३ या कालावधीमध्ये विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. या विशेष मोहिमेतर्गंत पंढरपूर न्यायालयातील एकुण २५८ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला असल्याची माहिती तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश एम. बी. लंबे यांनी दिली. फौजदारी प्रक्रिया संहिता कायदा कलम २५६ व २५८ ची एकुण ३४८ प्रकरणे दिनांक ४ ते ८ सप्टेंबर २०२३ या कालावधीमध्ये ठेवण्यात आलेली होती, त्यामध्ये एकुण २५८ प्रकरणांचा निपटारा करण्यात आलेला आहे. यामध्ये न्यायदंडाधिकारी पी. पी. बागुल यांनी ३२ पैकी २४ प्रकरणे, न्यायदंडाधिकारी ए. एस. सोनवलकर यांनी ५८ पैकी १३ प्रकरणे, न्यायदंडाधिकारी श्रीमती पी. एन. पठारे यांनी २८ पैकी २८ प्रकरणे तसेच सर्वाधिक जास्त श्रीमती एस. ए. साळुंखे यांनी २३० पैकी १९० प्रकरणांचा निपटारा करण्यात आलेला आहे.

विशेष मोहिमेतर्गंत आयोजनामुळे मोठ्या प्रमाणात छोट्या छोट्या प्रकरणांचा निपटारा होत असल्याने पक्षकार व विधीज्ञांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



## पुरस्काराबद्दल गिरिजा नाईकनवरे यांचा सत्कार

**वेळापूर** : बोंडले येथे ग्रामपंचायतीच्यावतीने सरपंच विजयसिंह माने देशमुख व उपसरपंच नितीन शिंदे यांच्या हस्ते जि प शाळेतील शिक्षिका गिरीजा नाईक नवरे यांना सोलापूर जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी रिपाइं माळशिरस तालुका उपाध्य महेंद्र लोंढे, चेअरमन धनाजी जाधव, ग्रामपंचायत सदस्या साधना प्रदीप पाटील, लालासाहेब जाधव, मुख्याध्यापक कवडे , जि प शाळा उपअध्यक्ष तानाजी जाधव, धोत्रे ग्रामपंचायत कर्मचारी योगेश तुपे विजय लोंढे आदी उपस्थित होते.

# ग्रॅज्यूटी व पेन्शन विक्रीच्या रकमा शासनाकडून थकीत

### उपोषणाचा शिक्षकांचा इशारा

सुराज्य/सोलापूर

राज्यातील जिल्हा परिषद सेवेतून सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांचे ग्रॅज्यूटी व पेन्शन विक्रीचे कोट्यावधी रकमा शासनाने थकीत ठेवल्या आहेत त्या रकमा आम्ही काय म्हातारे झालोत म्हणून द्यायचे नाहीत का ? असा संतप्त सवाल सेवानिवृत्त शिक्षकामधून होत आहे. याचा परिणाम अगामी निवडणुकी मध्ये राज्य कर्त्यांना भोगावे लागतील. येत्या गांधी जयंती दिवसी आमरण उपोषण करण्याचा इशारा शिवानंद भरले यांनी राज्य शासनाला दिली आहे.

खासगी शिक्षकांना. कार्यालयात काम करताना रकमा दिली आहेत फक्त जिल्हा परिषद मध्ये सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकानाच या रकमा थकीत ठेवले आहेत.

३१ मे २०२२ पासून आजतागायत सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांना त्या देण्यात आले नाहीत. एका एका शिक्षकांचे ३६ लाख रूपये देय आहे त्याचे व्याज शासन देणार का ? जिल्हा परिषद मधील सेवानिवृत्ताचे वाली कोण आहे का नाही. ? गांधी जयंती दिवशी शिक्षण संचालक व शिक्षणायुक्त कार्यालयासमोर उपोषणाचा ईशारा दिला आहे. या वेळी वंसत दिघे, दादाराजे देशमूख सुभाष फूलारी मल्लिकार्जुन बडदाळ उपस्थित होते.

# भाजपाने केलेल्या विकास कामाचा जाहीरनामा जनतेला दाखवा

## प्रदेश संयोजक गणेश जगताप यांचे आवाहन

सुराज्य/सोलापूर

भारतीय जनता पार्टीने नऊ वर्षांमध्ये केलेल्या विकास कामाचा जाहीरनामा जनतेसमोर घेऊन जा आणि जनतेला दाखवा असे आवाहन पंचायत राज व ग्राम विकास विभागाचे प्रदेश संयोजक गणेश जगताप यांनी केले

भारतीय जनता पार्टीच्या वतीने पंचायत राज ग्राम विकास विभागाच्या जिल्हा कार्यालयाचे उद्घाटन मोहोळ येथील गुंड कॉम्प्लेक्स या ठिकाणी करण्यात आले. मोहोळ शहरातून भव्य रॅली काढण्यात आली त्यानंतर शहाजीराव पाटील सभागृह येथे कार्यकर्त्यांचा मेळावा घेण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा संयोजक दशरथ काळे यांनी केले होते, त्यावेळी कार्यकर्त्यांना आवाहन करताना पंचायत राज ग्राम विकास विभागाचे प्रदेश संयोजक गणेश जगताप हे बोलत होते



यावेळी सहसंयोजक प्रसाद कुलकर्णी, सोलापूर जिल्हा संयोजक दशरथ काळे समाधान गायकवाड, वाघमोडे पश्चिम महाराष्ट्र संयोजक रणजीत फाळके, सहसंयोजक निनाद पटवर्धन, भाजपा माजी जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघमारे, माढा विभाग जिल्हाध्यक्ष नितीन नागटिळक, बादलसिंह ठाकुर, महादेव खिलारे, नागेश क्षीरसागर, विजयकुमार बिराजदार, प्रशांत सापनेकर, बसवराज करजगी, चनविर लंगोटे, नितीन धोत्रे, मनोज पवार, रोहिदास बंदपट्टे, पृथ्वीराज काळे,अविनाश क्षीरसागर, संजय वाघमोडे, बाळूदादा क्षीरसागर, नितीन करंडे, जांबुवंत उराडे, सुरेश काळे, आकाश राऊत, संकेत मुचंडे ,विलास ढेरे, आदीसह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## लक्ष्मीनगर जि. प. प्राथमिक शाळेत दहीहंडीचे आयोजन

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लक्ष्मीनगर याठिकाणी श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त दहीहंडी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. लहान मुलांमध्य आपला सांस्कृतिक वारसा जपला जावा यासाठी याठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कुसमोडच्या उपसरपंच स्वाती मदने, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय पाटील, रणजित पाटील, विजय मदने, पल्लवी मदने,नंदकुमार पाटील, राहुल लवटे,मुख्याध्यापक सुहास कोल्हे, सहशिक्षक सुनील डुरे, अंगणवाडी सेविका सत्यभामा मदने व विद्यार्थी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नागणा दिवटे यांचे निधन



**अक्कलकोट** : सुभाष शिक्षण संस्था संचलित आदर्श प्राथमिक शाळेचे चेअरमन नागणा सायबणा दिवटे यांचे निधन झाले आहे ते वयाचे ६९ वर्षाचे होते त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले सुना नातवंडे असा परिवार आहे मैंदर्गी नगरपरिषदचे माजी नगरसेवक तसेच शहरातील शावरी गोब्बुर लुकडे गटाचे गटप्रमुख होते त्यांनी सामाजिक शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात मोठे योगदान होते अक्कलकोट स्वामी समर्थ बँकेचे माजी संचालक काशिनाथ दिवटे यांचे बंधू होत. त्यांच्यावर शेत मळ्यात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# वटवृक्ष स्वामी महाराजांचे दर्शन घेऊन धन्य झाले : पंकजा मुंडे

सुराज्य/अक्कलकोट

आज पर्यंत राजकीय जीवन प्रवासात देशातील विविध ठिकाणी भेटी देण्याचा योग आला. अनेक ठिकाणी श्री स्वामी समर्थांची मंदिरे आमच्या निदर्शनास आली आहेत. त्या ठिकाणी तात्काळ जाऊन आम्ही स्वामी समर्थांचे दर्शन घ्यायचो, परंतु आज स्वामी महाराज मंदिरात येऊन स्वामींचे दर्शन घेण्याचे भाग्य लाभले म्हणून आजचा हा दिवस माझ्या जीवनातील विशेष दिवस आहे माझे जीवन धन्य झाले असल्याचे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय सरचिटणी पंकजा मुंडे यांनी केले.



नुकतेच मुंडे यांनी येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांच्या अधिपत्याखाली देवस्थानचे सेक्रेटरी आत्माराम घाटगे व आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी पंकजा मुंडेंचा सन्मान केला.

पंकजाताई यांनी श्री स्वामी समर्थांच्या वटवृक्ष मंदिरातील हे रमणीय परिसर, प्रसन्न वातावरण, स्वामी समर्थांची मन-चित्त प्रसन्न करणारी दर्शन मूर्ती हे सारेच अद्भुत आहे. मला येथे पुन्हा पुन्हा स्वामी दर्शनाकरिता येण्याची इच्छा होईलच. ज्या ज्या वेळी मला स्वामी दर्शनाची इच्छा होईल त्यावेळी स्वामींनी त्यांच्या दर्शनाकरिता आपल्याला येथे बोलावून घ्यावे व मला स्वामी दर्शनाची संधी उपलब्ध करून द्यावी असे सांगून समितीच्या कार्याचा शब्दात्मक गौरव केला. यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, पुजारी, नगरसेवक महेश हिंडोळे, प्रभाकर मजगे, मल्लिनाथ स्वामी, शिवशरण जोजन, मोतीराम राठोड, नन्नू कोरबू, राहुल ढोबळे, राहुल वाडे, दयानंद बिडवे, नागु कुंभार, अविनाश मडिखांबे, धनंजय गाढवे, मंदिर समितीचे विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, विपुल जाधव, श्रीकांत मलवे, ऋषिकेश लोणारी, संजय पवार, प्रसाद सोनार, आदिसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## मराठा समाजाला आरक्षणाला आपकडून पाठिंबा

सुराज्य/अक्कलकोट

महाराष्ट्र राज्यात मराठा समाज हे खूप वर्षापासून आरक्षणाकरिता शांतचित्तेने आंदोलन करत होते पण काही दिवसापूर्वी आंदोलनादरम्यान पोलिसांकडून जालना येथे झालेल्या लाटी मारा वरून बहुतांश लोक हे गंभीररित्या जखमी झालेले आहे. मराठा आरक्षणास आपचा पाठिंबा असल्याचे अक्कलकोट चे संघटन मंत्री प्रसाद बसवराज बाबानगरे यांनी म्हटले आहे.

जखमी आंदोलनकांना सरकारी खजिन्यातून अर्थात संपत्तीतून आर्थिक मदत म्हणून कमीत कमी दोन लाख देण्यात यावा व तसेच महाराष्ट्र राज्याचे जबाबदार गृहमंत्री यांनी राजीनामा द्यावा असे आम आदमी पार्टी जिल्हा सोलापूर तालुका अक्कलकोट चे संघटन मंत्री प्रसाद बसवराज बाबानगरे यांनी मागणी केली आहे.

# गौरी, गणपती उत्सवात शिधापत्रिकेसोबत पूजासाहित्य मिळणार

## ▶▶ समर्थ कृपा फेडरेशनचा पुढाकार ▶▶ नोंदणीला दुकानदारांकडून मोठा प्रतिसाद

✔ सुराज्य/सोलापूर

**आगामी गौरी, गणपती उत्सवात रेशन दुकानातून शासनाच्यावतीने देण्यात येणाऱ्या शंभर रुपयांतील आनंदाच्या शिधासोबतच आता १३० रुपयांत पूजा साहित्याचे कीट मिळणार आहे. यात हळद, कुंकू, कापूर, धूप, अगरबत्ती, समई वात अशा पूजेच्या विविध दहा वस्तू असणार आहेत. यासाठी रेशन दुकानदारांनी स्थापन केलेल्या समर्थ कृपा फेडरेशनने पुढाकार घेतला आहे.**

अत्यंत कमी दरात म्हणजेच १७५ रुपयांच्या या वस्तू अवघ्या १३० रुपयांत शिधापत्रिकाधारकांना मिळणार आहेत. यात शिधापात्रिकाधारकांची थेट ४५ रुपयांची बचत होणार आहे. शिवाय १०० ग्रॅम चहापावडर या संचावर अगदी मोफत मिळणार आहे. थेट कंपनी ते ग्राहक असा हा समर्थ कृपा फेडरेशनचा उद्देश असून ऐन सणासुदीत शिधापत्रिकाधारकांना यातून दिलासा मिळणार आहे.

> दुकानदारांच्या अडचणी पाहून पुणे पुरवठा विभाग अंतर्गत असलेल्या सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे, सोलापूर या पाचही जिल्ह्यांतील जिल्हाध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनी गरज ओळखून दुकानदारांना सन्मानाने जगता यावे याकरीता रेशन दुकानदारांनी माजी पुरवठा उपायुक्त तथा सध्याचे बीडचे अपर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली 'समर्थ कृपा फेडरेशन' अशी संस्था स्थापन केली आहे, यातून ही योजन राबवली जात आहे.
>
> **- नितीन पेंटर,**
> समर्थ कृपा फेडरेशन संचालक सोलापूर जिल्हाप्रमुख.




रेशन दुकानदार संघटनेच्यावतीने शासन दरबारी बऱ्याचदा संप, आंदोलने करूनसुद्धा कमिशनमध्ये वाढ झालेली नाही.

इतर राज्यापेक्षा महाराष्ट्रातील रेशन दुकानदारांचे कमिशन जास्त व योग्यच असल्याने आता यापुढे कमिशनवाढ शक्य नसल्याचे काळाची काही दिवसांपूर्वीच शासनाने रेशन दुकानदारांना कळविले आहे. त्यामुळे उत्पन्नवाढीचे कोणतेच मार्ग आता दुकानदारांसमोर नाहीत.

शासनाचे पारदर्शकतेचे धोरण पाहता सर्व दुकानदारांनी आता कात टाकलेली आहे.

रेशन दुकानदारांना भविष्यात धान्यासोबत इतर वस्तूंची विक्री करुन उदरनिर्वाह करावा लागणार आहे. दैनंदिन जीवनात लागणाऱ्या तूरडाळ, तेल, साखर यासारख्या अनेक अत्यावश्यक वस्तू समर्थ कृपा फेडरेशनच्या माध्यमातून दुकानदारांना लवकरच उपलब्ध होणार आहेत. आता गौरी, गणपती उत्सवासाठी आनंदाच्या शिधासोबत महाराष्ट्रात पहिल्यांदाच आकर्षक पॅकिंगमध्ये पूजा साहित्याच्या दर्जेदार दहा वस्तू सवलतीच्या दरात उपलब्ध होणार असून यासोबतच १०० ग्रॅम चहापावडर मोफत मिळणार आहे.



## मेट्रोतर्फे महावीर हायस्कूलला संगणक संच प्रदान

✔ **सोलापूर** : विकास नगर जवळील महावीर हायस्कूलला लायन्स क्लब ऑफ सोलापूर मेट्रोतर्फे संगणक संच प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून प्रशालेच्या मुख्याध्यापिका उज्वला पाटील व प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार शिवशरण पाटील, लायन्स क्लब ऑफ सोलापूर मेट्रोचे अध्यक्ष ला. ईश्वर झुंजा, सेवानिवृत्त विस्तार अधिकारी अशोक भांजे, लायन्स क्लबचे सचिवा ला. शलाका कुलकर्णी, कॅबिनेट ऑफिसर ला. महिबूब शेख आदी उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांचा सत्कार मुख्याध्यापिका उज्वला पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. उपस्थित सर्व मान्यवरांनी प्रशालेच्या मुख्याध्यापिका उज्वला पाटील यांना संगणक संच प्रशालेस भेट दिली. यावेळी शिवशरण पाटील म्हणाले की, 'आपल्या प्रशालेला लायन्स क्लबने संगणक संच देऊन फार महत्त्वाचे काम केलेले आहेत. सध्या संगणक युग आहे. या युगात जास्तीत जास्त संगणकाचे ज्ञान संपादन करुन उच्च शिक्षण प्राप्त करावे अशा शब्दात मत व्यक्त केले. ईश्वर झुंजा, अशोक भांजे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन सहशिक्षक बसवराज बिराजदार, आभार अभिनंदन विभूते यांनी केले.



## करजगी ऑर्किड स्कूलमध्ये रंगला श्रीकृष्ण जन्माष्टमीचा सोहळा

✔ **सोलापूर** : भगवान श्रीकृष्ण यांचा अवतार दिन अर्थात गोकुळाष्टमी या सणाचे औचित्य साधून सोलापूर शहरातील नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये बालचमूंच्या दहीहंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार करजगी, सचिवा वर्षा विभूते, व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्राचार्या रुपाली हजारे, प्रि. प्रायमरीच्या प्राचार्या अनिता अनगोंडा आदी मान्यवर उपस्थित होते.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते भगवान श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे व प्रतिकात्मक पाळण्याचे पूजन करण्यात आले. यावेळी प्रशालेतील संगीत शिक्षिका मयुरा देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली आर्या हजारे, आरोही खाडे, मिताली माने, आरोही सावंत, आरोही शितोळे, सिध्दी पटने, तनु बुरिया, श्रेया बनसोडे या विद्यार्थ्यांनी जन्माष्टमीच्या पार्श्वभूमीवर भगवान श्रीकृष्णाच्या जीवनावरील आधारीत गीत सादर केले. तर नृत्य शिक्षक अन्वर शेख व देवकी राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली नृत्य सादर करुन कार्यक्रमाची शोभा वाढविली. सूत्रसंचालन पूनम शर्मा यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



## छन्नूसिंग चंदेलेंच्या स्मृतीला जयंतीनिमित्त अभिवादन

✔ **सोलापूर** : थोर स्वातंत्र्यसेनानी भाई छन्नूसिंग चंदेले यांच्या ११८व्या जयंतीनिमित्त चंदेले स्मृती केंद्रातील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी सोलापूर शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष चेतन नरोटे, स्मृती केंद्राचे अध्यक्ष हेमू चंदेले, मनीष गडदे, सेक्रेटरी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी विनोद भोसले, प्रदेश उपाध्यक्ष महाराष्ट्र युवक काँग्रेस, डॉ. रोझा चंदेले-पाराशर, विश्वस्त स्मृती केंद्र, केशव इंगळे, रुस्तुम कंपली, श्रीकांत व्हटकर, सुधीर चंदेले, राहुल चंदेले, गंगाराम शिंदे, अमृतदत्त चिनी, श्रीनिवास कोंडा, दत्ता सोनवणे, बाळासाहेब शहा, सुधाकर कटारे, सविता चंदेले, मंजू घाडगे, मनिषा चंदेले, नागा सोनवणे, महादेव तोळणुरे, प्रा. सिद्धार्थ गायकवाड, प्रा. बाळासाहेब भास्कर, प्रा. विजय मोरे, प्रा. संतोष भागवत, उबाळे, तानाजी भांगे, गणेश पिंपळकर, प्रताप चंदेले, महादेव गावडे, किरण मदने, नितीन होसमनी, रामा गवळी, सचिन कांबळे, संजय कांबळे, शैलेंद्र ठाकूर, शैलेश राजपूत, ज्योतिबा राऊत, राणी भुजंगे, डॉ. हर्ष यादव (नागपूर), नागनाथ वाडकर, सदाशिव नरळे आदी या कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित होते.

## शिंगडगाव प्रशालेला व्हॉलीबॉलमध्ये उपविजेतेपद

✔ **सोलापूर** : पंचायत समिती द. सोलापूर यांच्यावतीने आयोजित तालुकास्तरीय पावसाळी क्रीडा स्पर्धा अंतर्गत व्हॉलीबॉल या सांघिक सामन्यात स्वामी विवेकानंद हायस्कूल शिंगडगावच्या खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले आहे. या स्पर्धेत १७ वर्षे वयोगटातील मुले उपविजेते तसेच सामन्यात १९ वर्षे व १४ वर्षे वयोगटातील मुलींच्या संघाने उपविजेतेपद पटकावले आहे.

या यशाबद्दल संस्थाध्यक्ष सुभाष भिमणवरु तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी, सर्व शिक्षक, शिक्षिका व सेवक कर्मचारी, गावकरी यांच्यावतीने यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन करण्यात आले. सर्व विजेत्या खेळाडूंना क्रीडा शिक्षक निंबण्णा बिराजदार यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

# ताडसौंदणे येथे कोयत्याने हल्ला; गुन्हा दाखल

✔ सुराज्य/सोलापूर

भावकीतील पूर्वीच्या भांडणातून बेसावध असताना कोयत्याने केलेल्या हल्ल्यात २५ वर्षीय तरुण गंभीर जखमी झाला. ही घटना ताडसौंदणे (ता. बार्शी) येथे गुरुवारी सायंकाळच्या सुमारास घडली . या प्रकरणात बार्शीच्या पोलिसांनी जखमीचा चुलत भाऊ गौरव गंगाधर शिंदे (रा.ताडसौंदणे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

प्रद्युम्न बाळासाहेब शिंदे (वय २५ रा. ताडसौंदणे) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याला बार्शी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी गौरव शिंदे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला . प्रद्युम्न शिंदे हे गुरुवारी सायंकाळच्या सुमारास शेतातील घरासमोर दुचाकी मधील पेट्रोल काढत बसले होते. त्यावेळी गौरव शिंदे हा अचानक पाठीमागून येऊन त्यांच्यावर कोयत्याने हल्ला केला. ते खाली कोसळले असता त्यांना लाथाबुक्क्याने मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार भोसले पुढील तपास करीत आहेत.

### तुळजापुरात मारहाण; तरुण गंभीर

तुळजापूर येथे केलेल्या मारहाणीत शुभम विठ्ठल गायकवाड (वय २४ रा.तुळजापूर) हा तरुण गंभीर जखमी झाला. ही घटना शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. त्याला तुळजापूर येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात वैभव (भाऊ) यांनी दाखल केले. त्याला अतुल लोहार, अमोल लोहार आणि समाधान लोहार या तिघांनी मिळून अज्ञात कारणावरून मारहाण केली.अशी नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### अक्कलकोट येथे अतिक्रमण काढताना धक्काबुक्की

अतिक्रमण काढण्याचे काम चालू असताना नगर परिषद आणि पोलिसांना धक्काबुक्की केल्याची घटना शुक्रवारी दुपारच्या सुमारास अक्कलकोट येथील जुना सरकारी दवाखान्याजवळ घडली . या प्रकरणात अक्कलकोट उत्तरच्या पोलिसांनी गंगाराम सातप्पा गायकवाड (वय ३४ रा. ब्यागेहळळी ) याचा विरुध्द पोलिसांनी शासकीय कामात अडथळा, धक्काबुक्की केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

# सोनी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

✔ सुराज्य/सोलापूर

माहेश्वरी विद्या प्रसारक मंडळ पुणे संचालित देशभक्त हरिनारायण बंकतलाल सोनी महाविद्यालय सोलापूर येथे दिनांक १० सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती भट्ट वसंती अय्यर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

परिषदेचा विषय पॅराडाईम शिफ्ट इन टेक्नॉलॉजी हा आहे.या आंतरराष्ट्रीय परिषदेचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रभारी रजनीश कामत उपस्थित असणार आहेत. परिषदेसाठी महादेव केशव बंगळूर, रवींद्र बगले पुणे, प्रतीक गुरुदत्त पोलंड, निशांत प्रभू कॅलिफोर्निया, करण कस्टम अमेरिका चेन्नई आदी प्रमुख उपस्थित राहणार आहेत. यातील प्रतीक गुरुदत्त पोलंड, निशांत प्रभू, कॅलिफोर्निया कश्यम टॅक्स, ससजा सुजा कॅलिफोर्निया व इतर मान्यवर हे भारतातून बेंगलोर पुणे मुंबई व चेन्नई येथून सहभागी होणार आहेत. या परिषदेसाठी एक्स डिझाईन वेब अँड मोबाईल प्लिकेशन कॉम्प्युटिंग टेक्नोलॉजी फोटो मिक्स स्टेटस इमेज प्रोसेसिंग सायबर सेक्युरिटी अशा विविध विषयांवर शोधनिबंध सादर करणार आहे.

आंतरराष्ट्रीय परिषद १० सप्टेंबर २०२३ सकाळी ९ ते संध्याकाळी साडेपाच वाजेपर्यंत कॉलेजमध्ये होणार आहे. तरी जिल्ह्यातील व इतर विषयावरील संशोधन रचनाकर असणारे प्राध्यापक विद्यार्थी या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी नोंदणी करून सहभाग घेऊ शकतात अशी माहिती भट्ट वासंती अय्यर, अशा रोकडे, देशभक्त हरिनारायण बंकटलाल सोनी महाविद्यालय सोलापूर यांनी केले आहे.

## किरकोळ कारणावरून तरुणास मारहाण ; दोघांवर गुन्हा

✔ **सोलापूर** : किरकोळ कारणावरून लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना ७ सप्टेंबर रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास आयडिया कॉलेजच्या मेन गेटच्या बाहेरील विद्यार्थी जनरल स्टोअर्स समोर घडली. याप्रकरणी नारायण मोतीलाल राठोड (वय-१९, रा.सेवालाल नगर, मार्डी तांडा) याने विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

## शोभानगर मंडळाच्या अध्यक्षपदी डॉ. मोरे



✔ **सोलापूर** : सात रस्ता परिसरातील शोभानगर तरुण मंडळाची वार्षिक सभा मंडळाचे ज्येष्ठ सदस्य नितीन गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होऊन मंडळाचे अध्यक्षपदी प्रा. डॉ. अजिंक्य मोरे व कार्याध्यक्षपदी सिद्धाराम अरळीकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे, उपाध्यक्ष विवेक दिवाणजी, सेक्रेटरी प्रमोद पैठणकर, खजिनदार अतुल शिंदे, मिरवणूक प्रमुख राहुल शिंदे, मल्लिनाथ अरळीकर, अभय कुलकर्णी, स्पर्धा प्रमुख इशान गांधी, माधवी गांधी, सजावट प्रमुख अनंत दिवाणजी, आश्विन भांगे, नियोजन समितीचे राजेंद्र कुलकर्णी, हरिभाऊ शिंदे, नितीन गांधी, विजय भांगे, रेवणसिद्ध प्याटी, प्रभाकर जाधव, भास्कर मोरे.

## जयशंकर मंडळाच्या अध्यक्षपदी विटेकर



✔ **सोलापूर** : जयशंकर तालिम सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची सभा समाजाचे अध्यक्ष सैदप्पा जंगडेकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सदर सभेमध्ये गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी विष्णू विटेकर यांची निवड करण्यात आली. यावेळी मंडळाच्या अन्य पदधिकाऱ्यांची देखील निवड करण्यात आली. त्यांची नावे खालीलप्रमाणे, उपाध्यक्ष गोपाळ गुराखे, सचिव कृष्णा पोतराज, सहसचिव बसवराज म्हेत्रे, खजिनदार गणेश जंगडेकर, सहखजिनदार लक्ष्मण वाघमारे, लेझीमप्रमुख भिमा वाघमारे, मिरवणूक प्रमुख अजय जंगडेकर, राम सुलगावकर, कार्याध्यक्ष राजेश क्यादास. सदर मीटिंगमध्ये माजी सचिव चंद्रशेखर बंतलेलु, युवक अध्यक्ष रतिकांत मार्तंड शिंगारे, कमलापुरे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## श्री संतसेना पुण्यतिथी सोहळ्याच्या अध्यक्षपदी माधुरी पारपल्लीवार



✔ **सोलापूर** : श्री संतसेना नाभिक बहुद्देशीय सेवा प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र नाभिक महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सालाबादप्रमाणे सोमवार ११ सप्टेंबर रोजी दु. १२ वाजता नाभिक समाजाचे आराध्य दैवत श्री संतसेना महाराज यांची पुण्यतिथी जयभवानी हौसिंग सोसायटी येथे गुलालाचा कार्यक्रम होणार आहे. हभप माऊली बचुटे महाराज यांचे प्रवचन व किर्तन होणार आहे. सोहळ्याचे अध्यक्षपदी महाराष्ट्र नाभिक महामंडळ महिला प्रमुख डॉ. माधुरी पारपल्लीवार यांची निवड करण्यात आली. तरी सर्व नाभिक समाज बंधु व भगिनींनी सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. माधुरी पारपल्लीवार आणि सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. हिंदूराव गोरे आणि माजी अध्यक्ष सुशांत क्षीरसागर, सचिव सिद्राम रुद्रार, उपाध्यक्ष निलकंठ हल्याळीकर, खजिनदार प्रकाश जोगीपेटकर, सहसचिव मोहन जमदाडे आणि सर्व संचालक मंडळाच्यावतीने करण्यात आले.

## आसरा तरुण मंडळाच्या अध्यक्षपदी गंभीरे



✔ **सोलापूर** : आसरा गणेशोत्सव तरुण मंडळाच्या अध्यक्षपदी तेजस गंभीरे यांची निवड करण्यात आली. यावेळी सुदर्शन हसापुरे, श्रध्देश पाटील, पद्मराज पाटील, तुलसीदास मोटे यांच्या अध्यक्षतेखाली ही निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी ओम सुतार, खजिनदारपदी दिनेश ढवणे यांची निवड, सेक्रेटरीपदी मरगूशा घोडके, विराग साठे, सचिवपदी सचिन नागूर, पूजा समिती आदर्श शिंदे, समर्थ मोटे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## विद्या साबळे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

✔ **सोलापूर** : राष्ट्रस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड नवी मुंबई यांच्यामार्फत यंदाचा नॅशनल ग्लोबल बेस्ट टिचर अॅवार्ड सहशिक्षिका विद्या सुरज साबळे एसव्हीसीएस हायस्कूल यांना घोषित करण्यात आला आहे. गेली १८ वर्षे या अध्यापनाचे कार्य करीत आहेत. त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल अनेक राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत. या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार घोषित केला आहे. हा कार्यक्रम १७ सप्टेंबर रोजी कामोटे नवी मुंबई येथे होणार आहे.

# मुलांना बोटाला धरुन शिक्षण दिल्यास प्रगती करतील : कोळी

## ▶ शिवतीर्थ-शारदा आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण

✔ सुराज्य/सोलापूर




तळागाळातील मुलांना त्यांच्या बोटाला धरुन शिक्षण दिल्यास ते आत्मविश्वासाने शिक्षण घेऊन जीवनात चांगली प्रगती करु शकतील, असा विश्वास कराड येथील नगरपरिषद शाळा क्रमांक ३चे मुख्याध्यापक अर्जुन कोळी यांनी व्यक्त केला.

छ. शिवाजी प्रशालेत मराठा समाज सेवा मंडळ सोलापूर व यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिनानिमित्त शिवतीर्थ व शारदा या आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण कोळी यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे मार्गदर्शनपर भाषणात म्हणाले की, 'आजचे प्रमुख पाहुण्यांचा सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आदर्श घ्यावा, त्यांनी जसे कष्ट केले आहेत, तसे आपण कष्ट करावेत.

याप्रसंगी नामदेव थोरात, विनायकराव पाटील, प्रभाकर खंडाळकर, अशोक चव्हाण, सुनीता साळुंखे, प्रा. महेश माने, शिवदास चटके, महादेव गवळी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी शैलजा मिट्टापल्ली, शोभा चव्हाण, अस्मिता जगदाळे, रुपा इंदापुरे, रेश्मा नवले, प्रा. डॉ. मधुकर पवार, अनिल जोशी, गणेश मुळे, अप्पासाहेब बोडके, राजू कसबे यांचा आदर्श शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सारिका पंडित व अविनाश आलदर यांनी केले तर आभार ज्ञानेश्वर सपाटे यांनी मांडले. या कार्यक्रमास सुजाता जुगदार, राजेंद्र शिंदे, प्रा. नागनाथ नवगिरे, महंमद शेख, महानंदा सोलापुरे, किशोर बनसोडे, दत्ता भोसले, उदयसिंह पवार, सुनीता निकम, उषा गोकळे, अविनाश गिराम आदींची उपस्थिती होती.

# प्रत्येकाने सामाजिक प्रश्न सोडवण्यात पुढाकार घ्यावा : पालकमंत्री

✔ सुराज्य/सोलापूर

प्रत्येक व्यक्तीने समाजात वावरत असताना या समाजाप्रती काही देणे आहे अशी समर्पित भावना ठेवून सामाजिक प्रश्न सोडवण्यात पुढाकार घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील रुरल डेव्हलपमेंट फाउंडेशन आयोजित शेतकरी, उत्कृष्ट अधिकारी व पदाधिकारी गौरव सोहळयात पालकमंत्री विखे-पाटील बोलत होते. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, विजयराजे ढोबळे, शोभा पवार, मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचे मंगेश चिवटे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री विखे-पाटील पुढे म्हणाले की, 'रुरल डेव्हलपमेंट फाउंडेशन द्वारा होत असलेल्या शेतकरी, उत्कृष्ट अधिकारी व पदाधिकारी गौरव सोहळयातील सर्व मान्यवरांनी त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केलेले असून त्यांच्या कार्यामुळे समाजाला मोठा फायदा झालेला आहे. अधिकाऱ्यांनी प्रशासकीय कामकाज करत असताना चाकोरी बाहेर जाऊन त्यांच्याकडे येणाऱ्या लोकांना मदत करून



त्यांचे प्रश्न सोडवण्यास हातभार लावलेला आहे, त्याचप्रमाणे शेतकऱ्यांनी अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करून शेती पिकाचे उत्पादन चांगले घेऊन अर्थव्यवस्थेला गती देण्याचा प्रयत्न केला आहे, अशा सर्व मान्यवरांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस त्यांनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी पालकमंत्री विखे-पाटील यांच्या हस्ते शेतकरी उत्कृष्ट अधिकारी व पदाधिकारी यांचा गौरव करण्यात आला. यामध्ये औसा विधानसभेचे आमदार अभिमन्यू पवार यांच्यावतीने त्यांच्या पत्नी शोभा पवार यांनी सत्कार स्वीकारला. मुख्यमंत्री सहायता निधीचे कक्ष प्रमुख मंगेश चिवटे, अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, जिल्हा नगरपालिका प्रशासन अधिकारी आशिष लोकरे, जिल्हा जलसंधारण अधिकारी दयासागर दामा, शेतकरी बाळासाहेब काळे, उद्योजक दत्तात्रय कोरे, संध्या खांडेकर, सीमा घाडगे व अन्य मान्यवरांचा सत्कार पालकमंत्री यांच्या हस्ते करण्यात आला. प्रारंभी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे -पाटील रुरल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. सुनील गावडे यांनी प्रास्ताविक केले व या कार्यक्रमाच्या उद्देश सांगितला.

## ▶▶ महत्त्वाचे वृत्त...

### किशोरी पेडणेकर यांच्या अडचणीत वाढ

✔ **मुंबई :** कथित बॉडी बॅग घोटळ्याप्रकरणी शिवसेना (ठाकरे गट) नेत्या, माजी महापौर किशोरी पेडणेकर यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) किशोरी पेडणेकर, माजी अतिरिक्त महापालिका आयुक्त (प्रकल्प), माजी महापालिका उपायुक्त (खरेदी/सीपीडी), खासगी कंत्राटदार वेदान्ता इनोटेक आणि अनोळखी सरकारी अधिकाऱ्याविरोधात मनी लाँडरिंग अंतर्गत (पीएमएलए) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कथित ४९.६३ लाखांच्या बॉडी बॅग खरेदी घोटाळ्याप्रकरणी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेनं ४ ऑगस्टला पेडणेकरांसह, माजी अधिकारी आणि अन्य जणांविरोधात गुन्हा दाखल केला होता. त्याच आधारावर ईडीनं गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पेडकरांसह इतरांना चौकशीसाठी बोलवण्यात येणार आहे.

### राकाँच्या तालुकाध्यक्षासह भाजप नगरसेवकावर गुन्हा

✔ **धाराशिव :** वाशी तालुक्यातील सोनेगाव, सारोळा येथील खंडित असलेला वीज पुरवठा लिंक लाईनचे काम तत्काळ पूर्ण करून सुरू करण्याच्या कारणावरून सहायक अभियंता हिंगमिरे यांना बेदम मारहाण करण्यात आली असून, त्यांच्या डोक्यात खुर्ची घातल्याने गंभीर दुखापत झाली आहे. शुक्रवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास शहरातील महावितरण कार्यालयात ही घटना घडली. मारहाणीत अभियंता ज्योतिर्लिंग हिंगमिरे हे गंभीर जखमी झाले असून हिंगमिरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अजित पवार गटाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सूर्यकांत सांडसे, विनोद माने यांच्यासह भाजपा नगरसेवक भागवत कवडे यांच्याविरुद्ध वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### कराडला सर्वात मोठे वैमानिक प्रशिक्षण केंद्र

✔ **कराड :** कराड विमानतळावर विद्यार्थ्यांना विमान चालवण्याचे प्रशिक्षण देण्याची कार्यवाही फ्लाईंग क्लबच्यावतीने सुरू असल्याची माहिती अँबिशिएन्स एव्हीएशान फ्लाईंग क्लबचे संचालक परवेझ दमानिया यांनी दिली. विमानतळ व्यवस्थापक कुणाल देसाई, प्रशिक्षण केंद्राचे पंकज पाटील आदी उपस्थित होते. परवेझ दमानिया म्हणाले की, 'आमदार पृथ्वीराज चव्हाण यांच्या पुढाकाराने कराड विमानतळावर वैमानिक प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले आहे. नुकतेच येथे नाईट लँडिंग यशस्वी झाले आहे. कराड विमानतळाची विस्तारवाढ झाल्यानंतर येथे राज्यातील मोठे वैमानिक प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येईल. प्रशिक्षणासाठीची पाच विमाने विमानतळावर आणण्यात आली आहेत.'

### तब्बल सात वर्षानंतर खुनाची उकल

✔ **अलिबाग :** तब्बल सात वर्षानंतर महाड चांडवे येथील समोद शेडगे यांच्या खुनाची उकल करण्यात रायगड पोलीसांना यश आले आहे. राज्य मानवी हक्क आयोगाच्या निर्देशामुळे या गन्ह्याची उकल झाली आहे. दि. ७ ऑगस्ट २०१६ रोजी समोद शेडगे यांचा अपघाती मृत्यू झाला होता. मात्र, या अपघातानंतर मयत समोद शेडगे यांची आई सरिता शेंडगे यांनी हा अपघात नसून घातपात असल्याची शंका आल्याने या प्रकरणाच्या तपासाची मागणी त्यांनी राज्य मानवी हक्क आयोगाकडे याचिका दाखल केली होती. या याचिकेनंतर आयोगाने पोलीसांना या प्रकरणात भादंवी कलम ३०२, २०१ अन्वये गुन्हा दाख करून पोलीस तपासाचे निर्देश दिले. अप्पर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे यांची या प्रकरणात तपास अधिकारी म्हणून नियुक्ती केली.

### फरार आरोपीला आठ वर्षांनंतर अटक

✔ **मुंबई :** गेली आठ वर्षे फरार असलेल्या एका सराईत आरोपीला आरसीएफ पोलिसांनी पाठलाग करून अटक केली. शरीफ शेख (२९) असे या आरोपीचे नाव असून तो मानखुर्दच्या लल्लूभाई कंपाऊंड परिसरात वास्तव्यास होता. आरसीएफ पोलिसांनी २०१६ मधील एका दरोड्याच्या गुन्ह्यात या आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला होता. मात्र हा आरोपी पोलिसांना सापडत नव्हता. हा आरोपी शुक्रवारी चेंबूरमधील रामटेकडी परिसरात येणार असल्याची माहिती आरसीएफ पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण मांढरे यांना मिळाली. त्यांनी तत्काळ पथकासह घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी त्याला पाठलाग करुन पकडले.

### म्हाडाला निधीची गरज, गंगाजळीचाही तुटवडा

✔ **मुंबई :** म्हाडाने अनेक प्रकल्प हाती घेतले असून या प्रकल्पांसाठी म्हाडाला मोठ्या निधींची नितांत गरज आहे. एकीकडे निधीची गरज, तर दुसरीकडे गंगाजळीचा तुटवडा अशा कात्रीत म्हाडा अडकले आहे. त्यामुळे धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत १६९० घरांच्या बांधकामासाठी खर्च केलेले ६४२ कोटी रुपये वसूल करण्याचे प्रयत्न म्हाडाच्या मुंबई मंडळाने सुरू केले आहेत. घरांच्या बांधकामापोटी आलेल्या खर्चाची रक्कम परत मिळावी, अशी मागणी मंडळाने धारावी पुनर्विकास प्रकल्पाकडे (डीआरपी) केली आहे.

### २५ कोटींच्या लाचप्रकरणी वानखेडेंना दिलासा

✔ **मुंबई :** दोन वर्षांपूर्वी समीर वानखेडे आणि इतर चौघांनी २०२१ मध्ये कॉर्डेलिया क्रूझमधून आर्यन खानला ताब्यात घेतलं होतं. या प्रकरणात आर्यनची निर्दोष सुटका करण्यासाठी शाहरुख खानकडून २५ कोटी रुपयांची लाच मागितली होती, असा आरोप त्यांच्यावर होता. वानखेडेंसह इतर चार जणांविरोधात भारतीय दंड संहिता अंतर्गत गुन्हेगारी कट आणि खंडणीच्या धमक्यांच्या आरोपाखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात आता केंद्रीय प्रशासकिय न्यायाधिकरण म्हणजेच 'कॅट'ने समीर वानखेडे याना दिलासा दिला आहे.

### बेकायदा पिस्तूल हाताळताना तरुण जखमी

✔ **पुणे :** बेकायदा खरेदी केलेले पिस्तूल हाताळताना गोळी सुटल्याने तरुण जखमी झाला. बेकायदा पिस्तूल बाळगल्याप्रकरणी उत्तमनगर पोलिसांनी एकास अटक केली. खडकवासला परिसरातील सांगरुण गावात ही घटना घडली. अभय छगन वाईकर (वय २२) असे गंभीर जखमी झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी अविष्कार उर्फ मोन्या तुकाराम धनवडे (वय १९, रा. सांगरुण, ता. हवेली) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोह आनंद घोलप यांनी उत्तमनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

### सख्ख्या मुलानेच केली आईची फसवणूक

✔ **पुणे :** आईला आर्थिक मदत करण्याच्या बहाण्याने तिची बनावट स्वाक्षरी करून तिच्या सदनिकेची परस्पर विक्री करणाऱ्या प्रशांत पृथ्वीराज चव्हाण (रा. सोमवार पेठ) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत जयश्री पृथ्वीराज चव्हाण (वय ६८, रा. महमदवाडी, हडपसर) यांनी फिर्याद दिली आहे. मुलाशी वाद झाल्याने जयश्री या विवाहित मुलीकडे राहायला गेल्या. दरम्यान, चव्हाण यांना दुर्धर आजाराने ग्रासले. २०१८ मध्ये चव्हाण यांनी बक्षीसपत्र करुन मुलीच्या नावावर सदनिका केली. प्रशांत याला ही माहिती समजल्यानंतर चव्हाण यांची बनावट स्वाक्षरी करुन प्रशांतने परस्पर सदनिकेची एका व्यक्तीला विक्री केली. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर जयश्री चव्हाण यांनी पोलिसांकडे तक्रार दिली.

### महिलेची गळफास घेऊन आत्महत्या

✔ **ठाणे :** भिवंडी येथील टेमघर भागात राहणाऱ्या कविता गौड (३४) या महिलेने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा प्रकार उघडकीस आला. सासरच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याचा आरोप तिच्या भावाने केला असून याप्रकरणी सासरच्यामंडळींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भारताने अडीच हजार वर्षांपूर्वी मानव कल्याणाचा संदेश दिला

## ▶▶ दिग्गज राष्ट्रप्रमुखांसमोर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिला 'तो' संदर्भ

✔ सुराज्य/नवी दिल्ली

**पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशाची राजधानी दिल्लीत शनिवारपासून (९ सप्टेंबर) सुरू झालेल्या जी२० शिखर परिषदेत आपल्या पहिल्याच भाषणात अडीच हजार वर्षांपूर्वीचा संदर्भ दिला. तसेच भारताच्या भूमीने अडीच हजार वर्षांपूर्वीच मानवतेचं कल्याण व सुख निश्चित करण्याचा संदेश दिल्याचं नमूद केलं. या दोन दिवसीय परिषदेसाठी १९ राष्ट्रांचे प्रमुख व युरोपियन युनियनचे सदस्य दिल्लीत दाखल झाले आहेत.**




नरेंद्र मोदी म्हणाले, 'जी २० चा अध्यक्ष म्हणून भारत सर्व देशांचं स्वागत करतो. २१ व्या शतकातील हा काळ जगाला नवी दिशा दाखवणारा आणि नवी दिशा देणारा महत्त्वाचा काळ आहे. हा असा काळ आहे जेव्हा अनेक वर्षांच्या अडचणी आता नव्या उपाययोजनांची मागणी करत आहेत. म्हणून आपल्याला मानवकेंद्री दृष्टीने पाऊल उचलत जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील आणि पुढे जावं लागेल.'

आपण जमलोय त्या ठिकाणापासून काही अंतरावर एक स्तंभ उभारण्यात आला आहे. त्यावर मानवतेचं कल्याण व सुख नेहमीच सुनिश्चित केलं जायला हवं' असं लिहिलं आहे. अडीच हजार वर्षांपूर्वी भारताच्या भूमीनं हा संदेश जगाला दिला होता. या संदेशानिशी आपण या जी २० शिखर परिषदेला सुरुवात करुया, असं नरेंद्र मोदींनी नमूद केलं.

**वर्तमानासह भविष्यातील पिढ्यांसाठी आव्हानांवर उपाययोजना कराव्या लागतील**

मोदी पुढे म्हणाले, 'जागतिक अर्थव्यवस्थेतील चढउतार असो, उत्तर आणि दक्षिणमधील विभागणी असो, पूर्व आणि पश्चिममधील दुरावा असो, अन्न, इंधन आणि खते यांचं व्यवस्थापन असो, दहशतवाद आणि सायबर सुरक्षा असो, आरोग्य, उर्जा आणि पाणी सुरक्षा असो, वर्तमानासह भविष्यातील पिढ्यांसाठी आपल्याला या आव्हानांवर उपाययोजना करण्याकडे वाटचाल करावी लागणार आहे.'

**कोट्यावधी भारतीय जी२० परिषदेबरोबर जोडले गेले**

भारताचं जी २० परिषदेचं अध्यक्षपद देशांतर्गत आणि देसाच्या बाहेर समावेशकता आणि सर्वांना सोबत घेण्याचं प्रतिक झालं आहे. देशातील ६० शहरांमध्ये २०० हून अधिक बैठका झाल्या. भारतात जी २० जनतेची परिषद झाली आहे. कोट्यावधी भारतीय या परिषदेबरोबर जोडले गेले आहेत. सर्वांना सोबत घेण्याच्या भावनेनेच भारताने अफ्रीकन संघाला जी २० चं स्थायी सदस्यत्व देण्याचा प्रस्ताव दिला आहे. मला विश्वास आहे की, या प्रस्तावावर आपल्या सर्वांचं एकमत होईल, असंही मोदींनी नमूद केलं.

### इंडिया नाही, भारत असा उल्लेख

देशाचे नाव इंडियावरून 'भारत' असे बदलण्याची सध्या चर्चा सुरू आहे. अशातच शनिवारपासून सुरू झालेल्या जी २० शिखर परिषदेत 'इंडिया' नावाचा वापर टाळण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी भाषण करीत असताना त्यांच्या डेस्कसमोर 'भारत' असे नाव लिहिलेले होते. जगभरातील प्रमुखांचे स्वागत करताना मोदींकडून 'भारत' असाच उल्लेख करण्यात आला. शनिवारी 'भारत मंडपम्'मध्ये जगभरातील नेते उपस्थित झाले. मोरोक्कोच्या भूकंपात मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली अर्पण करून नरेंद्र मोदी यांनी परिषदेच्या भाषणाची सुरुवात केली. मोदींनी आफ्रिकन युनियनला जी २० चा स्थायी सदस्य बनवण्याचा प्रस्ताव मंजूर केला. यावर परिषदेत पोहोचलेल्या आफ्रिकन युनियनच्या प्रमुख अजाली असोमानी यांनी पंतप्रधानांची गळाभेट घेतली. त्यावेळी उपस्थितांनी टाळ्या वाजवून त्यांचे स्वागत केले. जगात विश्वासाचे संकट निर्माण झाले आहे. एकविसावे शतक जगाला नवी दिशा देणारे ठरणार आहे, त्यासाठी सगळ्यांनी एकत्र काम करून मानवतेचा विकास केंद्रस्थानी ठेवावा, असे मोदींनी आपल्या भाषणात सांगितले.

# लोकशाही संस्थांवर हल्ला : राहुल गांधी

✔ सुराज्य/नवी दिल्ली

'जी-२०' समूहाची शिखर परिषद ९ आणि १० सप्टेंबरला दिल्लीत पार पडत आहे. यासाठी ४० हून अधिक राष्ट्रप्रमुख आणि अधिकारी दिल्लीत दाखल झाले आहेत. या विदेशी पाहुण्यांना कोणताही त्रास होऊ नये, म्हणून पूर्ण तयारी करण्यात आली आहे. त्याच पार्श्वभूमीवर दिल्लीत मोठ्या प्रमाणात बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

राजघाट आणि परिसरात असलेल्या माकडांचा आणि कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिसांनी काही लोकांना तैनात केलं आहे. तसेच दिल्लीतील मुख्य मार्गावरील अनेक भागांना शेडनेटच्या (पडदा) आधारे झाकण्यात आला आहे. पण, भारताचे वास्तव लपवण्याची गरज नाही, अशा शब्दांत राहुल गांधी यांनी मोदी सरकारला खडसावलं आहे.

'एक्स' ( ट्वीटर ) अकाउंटवर राहुल गांधी म्हणाले, 'केंद्र सरकार आमचे गरीब लोक आणि प्राण्यांना लपवण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र, पाहुण्यांपासून भारताचे वास्तव लपवण्याची गरज नाही.

दुसरीकडे काँग्रेसच्या 'एक्स' अकाउंटवरून मोदी सरकारला लक्ष्य करण्यात आलं आहे. जी-२० पूर्वी मोदी सरकारने आपलं अपयश लपविण्यासाठी नागरिकांच्या घरावर शेडनेट टाकण्याचं काम केलं आहे. कारण, राजा गरीब लोकांचा द्वेष करतो, अशी टीका काँग्रेसने मोदी सरकारवर केली आहे.

# प्रतिज्ञापत्राबाबतच्या खटल्यात फडणवीस दोषमुक्त

## गुन्हे लपवल्याचे सिद्ध होत नसल्याचे न्यायालयाचे निरीक्षण

✔ सुराज्य/मुंबई

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविरुद्धच्या निवडणूक शपथपत्रात गुन्ह्याची माहिती लपवल्याचा आरोप असलेल्या खटल्यात प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी संग्राम जाधव यांनी त्यांना निर्दोष ठरवले. लोकप्रतिनिधी कायद्यानुसार, आरोपींवरील दोन्ही गुन्हे हे निवडणुकीवर परिणाम करणारे नव्हते. त्यामुळे मुद्दाम गुन्हे लपवल्याचे सिद्ध होत नसल्याचे



दोन गुन्ह्यांची माहिती लपवली, अशी तक्रार त्यांनी प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी न्यायालयापुढे केली होती.

हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेले होते. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी खटला चालवण्यात यावा, असे आदेश दिले होते. त्यानंतर प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी न्यायालयात खटला सुरू झाला.



# आंध्रात हाय व्होल्टेज ड्रामा; माजी मुख्यमंत्री चंद्राबाबूंना अटक

✔ सुराज्य/हैद्राबाद

आंध्रप्रदेशचे माजी मुख्यमंत्री व तेलुगु देसम पक्षाचे अध्यक्ष चंद्राबाबू नायडू यांना शनिवारी भल्या पहाटे अटक करण्यात आली आहे. मध्यरात्री उशीरा त्यांना अटक वॉरंट देण्यात आल्यानंतर त्यांच्या कार्यकर्त्यांसह खुद्द चंद्राबाबू नायडूंनीही अशाप्रकारे आपल्याला अटक केली जाण्याला विरोध केला. मात्र, अखेर सीआयडी अधिकाऱ्यांनी त्यांना अटक केली असून आता वैद्यकिय तपासणीनंतर चंद्राबाबू नायडूंची रवानगी तुरुंगात होणार आहे. विशेष म्हणजे त्यांच्या व्हॅनिटी व्हॅनमधूनच त्यांना अटक करण्यात आली आहे.

**नेमके काय झाले?**

चंद्राबाबू नायडू आंध्रप्रदेशच्या नंदयाल शहरात एका सभेसाठी शुक्रवारी संध्याकाळी उपस्थित होते. रात्री सभा संपवून ते आपल्या व्हॅनिटी व्हॅनमध्ये बसले असताना त्यांना सीआयडीनं त्यांचं अटक वॉरंट सोपवलं. त्यामुळे त्यांच्या कार्यकर्त्यांसह खुद्द चंद्राबाबू नायडूही संतप्त झाले. आपण एक माजी मुख्यमंत्री आहोत, आपल्याला एनएसजीचं संरक्षणही आहे. अशाप्रकारे ही अटकेची कारवाई कशी होऊ शकते? असा जाब विचारताना ते व्हिडिओमध्ये दिसले.

# मोरोक्को भूकंपाने हादरले

## ६३२ जणांचा मृत्यू; अनेकजण गंभीर जखमी

✔ सुराज्य/मोरोक्को

मोरोक्को देश भूकंपाने हादरलं आहे. मोरोक्कोला ६.८ रिश्टर स्केलच्या भूकंपाचे धक्के बसले आहेत. यात इमारती कोसळल्या असून मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. तर, ६३२ जणांचा मृत्यू आणि अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

शनिवारी पहाटेच्या सुमारास मोरोक्कोत भूकंपाने हाहाकार माजवला. पहाटे ६.८ रिश्टर स्केल भूकंपाचे धक्के मोरोक्कोत बसले. यानंतर मोरोक्कोत अनेक इमारती कोसळल्या. यामध्ये ६३२ जणांचा मृत्यू झाला आहे. तर, ३२९ जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी जवळील



रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. भूकंपानंतर प्रशासनाकडून बचावकार्यास सुरूवात करण्यात आली आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू मोरोक्कोच्या मारकेश शहरापासून सुमारे ७० किलोमीटर अंतरावर होता. भूकंपाचे धक्के इतके तीव्र होते की, मारकेशपासून ३५० किलोमीटर अंतरावर असलेल्या राजधानी रबातमध्येही त्याचा प्रभाव जाणवला.

# पाऊस परतला, धरणे भरली

✔ सुराज्य/पुणे

गेल्या अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर खडकवासला धरणसाखळी प्रकल्पातील चारही धरणांच्या परिसरात शुक्रवारी पावसाने हजेरी लावली. चारही धरणांमध्ये सध्या ९३ टक्के पाणीसाठा झाला आहे. खडकवासला धरणातून सिंचनासाठी, वरसगाव आणि पानशेत धरणांमधून वीजनिर्मितीसाठी पाणी सोडण्यात येत आहे.

पुणे शहराला आणि जिल्ह्यातीलशेतीलाखडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर



या धरणांमधून पाणीपुरवठा केला जातो. या चारही धरणांत मिळून एकूण २७.१६ अब्ज घनफूट (टीएमसी) पाणीसाठा जमा झाला आहे. गेल्या वर्षी आजपर्यंत २९.४ टीएमसी (९९.६१ टक्के) पाणीसाठा जमा झाला होता. दिवसभरात टेमघर धरण परिसरात २५ मिलिमीटर, वरसगाव धरणक्षेत्रात २० मिमी, पानशेत धरण परिसरात १८ मिमी आणि खडकवासला धरण परिसरात १३ मिमी पावसाची नोंद करण्यात आली. वरसगाव आणि पानशेत धरणे पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे या धरणांमधून ६०० क्युसेक वेगाने वीजनिर्मितीसाठी पाणी सोडण्यात येत आहे.

खडकवासला धरणातून ग्रामीण भागासाठी नवीन मुठा कालव्याद्वारे १००५ क्युसेकने पाणी सोडण्यात येत आहे. खडकवासला धरणात सध्या ४५ टक्के, टेमघर धरणात ८० टक्के पाणीसाठा जमा झाला आहे, असे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले.

# इंदापूरच्या शेतकऱ्याने कमावले नाव

✔ सुराज्य/इंदापूर

पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील युवा शेतकऱ्याने मागील २५ ते ३० वर्षांपासून दूध व्यवसाय करूनही अपेक्षित नफा शिल्लक राहत नसल्याने मागील दीड वर्षांपासून दुधापासून विविध पदार्थ बनवण्याचा निर्णय घेतला. आणि आज घरच्या दुधापासून पेढे, बासुंदी, खवा, कुल्फी, पनीर असे विविध पदार्थ बनवून विकल्याने अपेक्षित नफा मिळवण्यात एका युवकाने यश मिळवले आहे. पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील सराफवाडी येथील हा युवक आहे. स्वप्निल शिंदे असे या युवकाचे नाव आहे.

अलीकडच्या काळात ठिकठिकाणींच्या दूध उत्पादक शेतकऱ्यांनी दुधाला योग्य भाव मिळत नसल्याने नाराजी व्यक्त केली आहे. मात्र, दूध उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या दुधाचा उपयोग करत विविध पदार्थ बनवून ते बाजारात विकल्यास नक्कीच फायदा होऊ शकतो याचे उत्तम उदाहरण स्वप्नील शिंदे या युवा शेतकऱ्याने घालून दिले आहे.

सराफवाडीच्या स्वप्नीलचा पन्नास गाईंचा गोठा आहे. या गाईंपासून दररोज सुमारे साडेचारशे ते पाचशे लिटर दूध मिळते. हे दूध डेअरीला न देता या दुधापासून पेढे, बासुंदी, खवा, कुल्फी, पनीर आधी पदार्थ बनवून ते बाजारात विकले जात आहे. विशेष म्हणजे या शेतकऱ्याने बनवलेल्या पदार्थांना विशेषता कंदी पेढे, साधे पेढे याला अधिकची मागणी होत आहे. स्वप्निलने बनवलेल्या पदार्थांना सोलापूर, नगर, पुणे, इंदापूर, बारामती भागातून मागणी होत असून तिकडे माल दिला जातो.

दूध उत्पादक शेतकऱ्यांनी कमी गाईत जास्तीचे उत्पादन मिळवण्यासाठी सिमेंसवर काम करावे. सिमेंस वापरायचे झाल्यास बायफमध्ये एबीएसमध्ये वापरू शकता किंवा डब्ल्यू डब्ल्यू एस मध्ये वापरू शकता. तुम्ही सिमेंस मध्ये काम केल्यास कमीत कमी गाईंमध्ये जास्तीत जास्त दूध मिळू शकते. आणि जास्तीत जास्त दूध मिळालं तर दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या गोठ्याचा खर्च कमी होऊ शकतो अशी माहिती शिंदे यांनी बोलताना दिली.

मागील ३० वर्षांपासून दुधाचा व्यवसाय करूनही अपेक्षित पैसा



हातात पडत नव्हता. यावर उपाय म्हणून मागील दीड वर्षांपासून घरच्याच गाईंच्या दुधापासून विविध पदार्थ बनवून ते बाजारात विकल्याने या युवा शेतकऱ्याला भरघोस नफा शिल्लक राहत आहे. त्यामुळे इतरही दूध उत्पादक शेतकऱ्यांनी अधिकचा नफा मिळविण्याच्या दृष्टीने शिंदे या युवा शेतकऱ्याप्रमाणे प्रयोग करायला हरकत नाही.



महापालिकेने अतिक्रमण मोहीम धडाक्यात सुरू केली आहे. अनेक ठिकाणचे अतिक्रमण काढले जात आहेत. मात्र वर्षानुवर्षे रंगभवन येथे फूटपाथवर असणारे अतिक्रमण महापालिकेला अजून दिसले नाही का असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# युपीतील कामगार कुटुंबियांचा दोन दिवसांपासून जिल्हा प्रशासनाकडून पाहुणचार

## ठेकेदारांचे पगार न देता पलायन

सुराज्य/सोलापूर

काम केल्यानंतर दीड महिन्यापासून टेंभुर्णी येथील एका खासगी बांधकाम ठेकेदाराने कामगारांचा पगार दिला नाही. त्यामुळे संतापलेल्या व मूळचे उत्तर प्रदेशातील रहिवासी असलेल्या कामगारांनी बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारातच कुटुंबासह ठिय्या मारला होता. याची दखल घेत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी या कामगार कुटुंबियांच्या राहण्याची व भोजनाची व्यवस्था शासकीय विश्रामगृहात केली. दरम्यान, कारवाईच्या भीतीने दोन दिवसात टेंभुर्णीचा ठेकेदार पळून गेल्याने उत्तर प्रदेशातील या कामगार कुटुंबियांचा सोलापुरातील शासकीय पाहुणचार मात्र वाढला आहे.

टेंभुर्णी येथील एका ठेकेदाराकडून सेंट्रींगचे काम सुरू आहे. या कामावर




उत्तर प्रदेशातील २१ कामगार मागील काही महिन्यांपासून काम करीत आहेत. मात्र गेल्या दीड महिन्यापासून ठेकेदाराने पगार न दिल्याने या कामगारांची उपासमार सुरू झाली. त्यांनी संतापून अखेर सोलापुरातील जिल्हाधिकारी कार्यालय गाठले. जिल्हाधिकारी बैठकात व्यस्त असल्याने त्यांची भेट होत नसल्याचे पाहून या कामगार कुटुंबियांनी प्रवेशद्वारातच ठिय्या मारला. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशान्वये प्रशासनातील इतर अधिकाऱ्यांनी या कामगार कुटुंबियांना थकित पगार मिळवून देण्यासाठी व त्यांना त्यांच्या गावाकडे पाठविण्यासाठी पुढाकार घेतला. त्यांच्या राहण्याची व भोजनाचीही व्यवस्था केली. अर्थात हे करताना प्रशासनातील अधिकाऱ्यांनी कोणताही गाजावाजा केला नाही. ठेकेदाराकडून काही रक्कमही कामगारांना मिळवून दिली. नंतर मात्र कारवाई होईल या भीतीपोटी ठेकेदार पळून गेल्याने कामगारांची चिंता वाढली आहे. प्रशासनाने मात्र कामगारांना थकित वेतन मिळेपर्यंत भोजनाची व राहण्याची सुविधा त्यांना पुरविली आहे. या पीडित कामगारांत महिला कामगारांची संख्या अधिक आहे. दीड महिन्यापासून पगार मिळत नसल्याने व उपासमार सुरू झाल्याने उत्तर प्रदेशातील गावाकडे जाण्यासाठी सर्व साहित्य सोबत घेऊनच कामगार जिल्हाधिकारी कार्यालयात आले आहेत. या कुटुंबांना न्याय देण्याचा प्रयत्न प्रशासकीय यंत्रणेकडून करण्यात येत आहे. ठेकेदाराने वेतन दिले नसल्याने उत्तर प्रदेशातील कामगार आले आहेत. त्यांचे थकित वेतन ठेकेदाराकडून देण्याचा प्रयत्न केला. त्याला काही अंशी यश आले आहे. त्यामुळे कामगार आता त्यांच्या गावाकडे परत जातील, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी दिली. मात्र संपूर्ण पगार मिळाल्याशिवाय येथून हलणार नाही, असा पवित्रा कामगारांनी घेतला आहे.

# कांदा अनुदान तक्रार निवारण्यासाठी जिल्हा व तालुका पातळीवर समित्या

सुराज्य/सोलापूर

कांदा अनुदान योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी व कांदा अनुदानाबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी तालुकास्तरावर तक्रार निवारण करण्यासाठी उपसहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांचे अध्यक्षतेखाली तर जिल्हापातळीवर जिल्हा उपनिबंधकांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.



राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समिती, खाजगी बाजार, थेट पणन अनुज्ञप्तीधारक अथवा नाफेड केंद्र यांचेकडे १ फेब्रुवारी ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत कांदा विक्री केला आहे. अशा शेतकऱ्यांना ३५० रूपये प्रति क्विंटल व जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रती शेतकरी या प्रमाणात कांदा अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दाखल अर्जाची छाणणी झाली आहे. शासनाकडून अनुदानाचे वाटप केले जाणार आहे. वाटपाच्या वेळी तक्रारी होण्याच्या शक्यता असल्याने कांदा अनुदान योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी व कांदा अनुदानाबाबत प्राप्त होणा-या तक्रारींचे निवारण करण्यासाठी उप सहाय्यक निबंधक अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय तक्रार निवारण समिती खालील प्रमाणे नियुक्त केलेली आहे. त्यामध्ये उप निबंधक अध्यक्ष तर तालुका लेखापरीक्षक कृषि उत्पन्न बाजार समिती सचिव सदस्य आहेत. जिल्हा स्तरावर तक्रार निवारण करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग -१, सहकारी संस्था (प्रशासन) सचिव यांची समिती गठित केली आहे.तक्रारींचे निवारण तालुका स्तरीय समितीकडे न झाल्यास जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीकडून सदर तक्रारींचे निवारण करावयाचे आहे. त्यासाठी सहाय्यक सहकारी अधिकारी जे. पी. ठाकरे यांच्या ९५२०६८१०४ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी केले आहे.

# खुपसंगी येथे जागेच्या वादातून मारहाण

सुराज्य/सोलापूर

भावकितीतील शेत जमिनीच्या वादातून काठी आणि दगडाने केलेल्या मारहाणीत दोघेजण जखमी झाले. ही घटना खूपसंगी (ता.मंगळवेढा) येथे शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली. या प्रकरणात मंगळवेढ्याच्या पोलिसांनी जखमींचे वडील आणि सख्ख्या भावासह तिघां विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. यासंदर्भात सिद्धेश्वर जोगप्पा टकले (वय ५० रा.खुपसंगी) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी त्यांचा भाऊ लक्ष्मण जोगप्पा टकले, त्याची पत्नी लोचना आणि वडील जोगप्पा टकले (सर्व रा.खुपसंगी) या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला.या तिघांनी मिळून केलेल्या मारहाणीत सिद्धेश्वर टकले आणि त्यांचा मुलगा महादेव हे दोघे जखमी झाले.

शेतातील वाटेच्या कारणावरून त्यांच्या भांडण झाले होते. त्यावेळी लक्ष्मण टकले यांनी तू मला शेत दे नाहीतर, कुणालाही जिवंत ठेवत नाही म्हणून काठीने दोघांना मारहाण केली. तर वडील जोगप्पा याने दगडाने तर भावजय लोचना हिने मारहाण केली, अशी नोंद पोलिसात झाली. तपास हवालदार घोंगडे करीत आहेत यावेळी लक्ष्मण जोगप्पा टकले ( वय ३७ ) आणि आणि जोगप्पा लक्ष्मण टकले (वय ८५ रा. खुपसंगी) हे दोघे जखमी झाले. त्यांना सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक नोंद सिव्हील पोलिसात झाली आहे.

# गणेशोत्सवानिमित्त पोलीस आयुक्तालयात बैठक

सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहरात दि.१९ ते २८ सप्टेंबर २०२३ या कालावधीत श्री.गणेशोत्संव साजरा होत असून,त्या अनुषंगाने पोलीस आयुक्त,सोलापूर शहर यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी १२ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता पोलीस आयुक्तालय कार्यालयात गणेशोत्सव सार्वजनिक मंडळाचे पदाधिकारी,सदस्य व शांतता समिती सदस्य यांची बैठक आयोजित करण्यात आलेली आहे.

# सांगोल्यात आज विविध विकासकामांचे भूमिपूजन

सुराज्य/सांगोला

सांगोला शहराच्या वैभवात भर टाकणाऱ्या सुमारे १२ कोटींच्या नवीन मध्यवर्ती प्रशासकीय दुमजली इमारतीसह १० कोटी रुपये खर्चून वंदे मातरम चौक ते मिरज रेल्वे गेट बायपास रोड काँक्रिटीकरणच्या सुमारे २२ कोटी रुपये कामाचे भूमिपूजन ११ रोजी आ. शहाजीबापू पाटील हस्ते होणारा आहे. यावेळी माजी आमदार दीपक साळुंखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व शेकापचे नेते डॉ. अनिकेत देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत ११ सप्टेंबर रोजी सकाळी १०:३० वाजता दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर सांगोला येथे भूमिपूजन होत आहे.

सुराज्यच्या वर्धापन व प्रदेशाध्यक्ष मा.चंद्रशेखर बावनकुळे यांच्या वर्षपूर्तीबद्दल हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
मा.श्री.महेश देवकर मा.श्री.अक्षय अंजीखाने मा.श्री.शिलवंत छपेकर
मा.श्री.चंद्रशेखर बावनकुळे
प्रदेशाध्यक्ष

दै.सुराज्यच्या वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
लोकनेते स्व.सुरेशदादा ठोंबरे (माजी जि.प./पं.सं.सदस्य)
शुभेच्छुक
मा.श्री.संदिप(दादा) ठोंबरे
संस्थापक अध्यक्ष स्व.सुरेशदादा ठोंबरे युवामंच माजी ग्रामपंचायत सदस्य नातेपुते
संदीप(दादा) ठोंबरे मित्र परिवार
ता.माळशिरस, जि.सोलापूर, नातेपुते

दै.सुराज्यच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
स्थापना -१९६४ रजि.नं. SUR/BNK/309/64
दि.बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट एम्प्लाईज को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.श्रीपूर, जि.सोलापूर
चेअरमन - विजय बापू पाटील
व्हा.चेअरमन - पांडुरंग दामोदर गोरे
संचालक: सुभाष ज्ञानोबा पवार, नवनाथ सदाशिव मलपे, कुमार नामदेव शिंदे, रामचंद्र गोरख गोफणे, रघुनाथ बळीराम देठे, संजय विश्वनाथ यादव, विश्नाथ अनंत कुलकर्णी, सौ.कविता विजय गुरव, सौ.सुनिता सर्जीराव जाधव
सेवकवर्ग: दादासाहेब सोपान मृसवडे - सचिव, महादेव दत्तू चौगुले - क्लार्क, जगदीश रावसाहेब थिटे

दैनिक सुराज्य सोलापूर वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा
महात्मा फुले ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या, माळीनगर व माळीनगर मल्टीस्टेट सोसायटी माळीनगर
ता.माळशिरस, जि.सोलापूर. मो.९७००३४०३०३
Email ID : mpmalinagar@gmail.com

| संस्थेची वैशिष्ट्ये | कालावधी | व्याज दर |
|---|---|---|
| सतत ऑडिट वर्ग 'अ' | कॉल डिपॉझीट | ६% |
| लाईट बील भरणा केंद्र | १ वर्ष | ८% |
| लॉकर सुविधा उपलब्ध | २ वर्ष | ८.५% |
| RTGS व NEFT सुविधा उपलब्ध | ३ वर्ष | ९% |
| SMS सुविधा उपलब्ध | दाम दुप्पट | १०० महिने |
| संपूर्ण संगणकीकृत संस्था | मुदत ठेवीवर ज्येष्ठ नागरिक ०.५०% जादा | |
| सोने तारण कर्ज सुविधा | | |
| सहकार भारतीय पुरस्कार प्राप्त | | |

श्री.महादेव खंडू एकतपुरे व्हा.चेअरमन | श्री.राजेंद्र गोपाळराव गिरमे चेअरमन
संचालक, सभासद व कर्मचारी वर्ग

दै.सुराज्यच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
मा.श्री.दर्शन दिलीप गांधी सौ.दिव्यश्री दर्शन गांधी
शुभेच्छुक डी.जी.मार्ट मॉल, नातेपुते
ता.माळशिरस, जि.सोलापूर. मो.९१६८४०००४१
निवडक व स्वच्छ किराणा, विनम्र व तत्पर सेवा सर्वांना आवडणारा व परवडणारा असा हा
डीजी मार्ट मॉल नातेपुते

दै.सुराज्यच्या वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
महिला व बाल कल्याण विभाग
जिल्हा परिषद, सोलापूर
मबाक विभागाअंतर्गत ग्रामीण भागातील महिला व मुली यांचे सक्षमीकरण तसेच त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी व्यवसायाभिमुख योजना, खालीलप्रमाणे आहेत.
गट अ
१. महिला व मुलींना तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण देणे.
२. इयत्ता ७ वी ते १२ वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण देणे.
३. मुलींना टॅली प्रशिक्षण देणे.
४. मुलींना स्वंयसंरक्षणासाठी व त्यांच्या शारीरिक विकासासाठी प्रशिक्षण देणे.
५. महिला समुपदेशन केंद्र.
६. विशेष प्राविण्य मिळविलेल्या १८ वर्षाखालील मुलांचा व मुलींचा सत्कार करणे.
७. इ.५ वी ते १२ वी पर्यंत शिकणाऱ्या मुलींसाठी सायकल पुरविणे.
८. माझी कन्या भाग्यश्री योजना
गट DBT योजना
१. पिको फॉल मशिन. २. पिठाची गिरणी.
३. कोंबड्या पालन.
४. विशेष घटक योजनेअंतर्गत महिलांना पिठाची गिरणी पुरविणे.
वरिलप्रमाणे योजनाकरिता खालील प्रमाणे सर्व साधारण अटी व शर्ती आहेत.
- लाभार्थी ग्रामीण भागातील रहिवासी असावी.
- उत्पन्न रु. १,२०,०००च्या आत असलेले तहसीलदार यांचा दाखला असावा.
- टॅलीकरिता इ. १० वी पास असणे आवश्यक.
- संगणक व टॅली प्रशिक्षणासाठी लाभार्थ्यांचे शाळा / महाविद्यालयाचा बोनाफाईड अथवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा गुणपत्रक जोडणे आवश्यक राहील.
- लाभार्थ्याने यापुर्वी सदर योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
- लाभार्थ्यांनी आधारकार्ड नोंदणी कार्डाची झेरॉक्सप्रत सोबत जोडणे आवश्यक असेल.
- उच्च शिक्षणासाठी १८ वर्षाखालील मुलांना व मुलींना उच्च शिक्षणासाठी कोणत्याही क्षेत्रातील म्हणजे कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकीय शाखेत प्रवेश घेतलेले प्रमाणपत्र.
- वैयक्तिक लाभाच्या योजनामध्ये लाभार्थी हिस्सा १०% भरणे आवश्यक आहे.
- पिठाची गिरणी ही विशेष घटक योजनेतील असल्याने लाभार्थी हा अनु. जातीचा असणे व त्यांचेकडील जातीचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. महिलासाठी समुपदेशन केंद्र चालविणेत येत असून कुटुंबातील मारहाण, लैंगिक छळ व इतर तऱ्हेने त्रासलेल्या व मानसिकदृष्ट्या असंतुलित महिलांच्या सामाजिक मानशास्त्रीयदृष्ट्या खचलेल्या महिलांकरिता कायदेशीर दृष्टीने समुपदेशन केले जाते.
- माझी कन्या भाग्यश्री योजना, १ ऑगस्ट २०१७ नंतर जन्म झालेल्या दोन मुलींपर्यंत आर्थिक सहाय्य दिले जाते.
वरील योजनांच्या अधिक माहितीसाठी गट विकास अधिकारी / बाल विकास प्रकल्प अधिकारी पंचायत समिती यांच्याशी संपर्क साधावा.
जिल्हा कार्यक्रम अधिकारी (बा.क.)
जि.प. सोलापूर

दैनिक सुराज्य सोलापूर वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा
पालकमंत्री मा.श्री.राधाकृष्ण विखे-पाटील
सरपंच मा.श्री.सुभाषबापू देशमुख
आमदार अक्कलकोट मा.श्री.सचिनदादा कल्याणशेट्टी
माजी जि.प.पक्षनेता मा.श्री. अण्णाराव बाराचारे
शुभेच्छुक श्री.अण्णाराव बाराचारे
माजी जिल्हा परिषद पक्षनेते

दैनिक सुराज्य सोलापूर वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा
महावीर गोवर्धन गो शाळा उपाध्यक्ष (फाउंडर सीईओ) मा.रोहित राजेश जैन
रत्नत्रय एज्युकेशन सोसायटी व्यवस्थापक मा.वैभव सुरेंद्र शहा
शुभेच्छुक
महावीर इलेक्ट्रिकल्स
नातेपुते मो.८८६०२०७३३२
रोहित कन्सल्टींग फर्म
(प्रतापगड, राजस्थान)

दै.सुराज्यच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा
श्री.किसनभाऊ जाधव मा. गटनेता सोमपा
श्री.नागेश(आण्णा) गायकवाड मा.नगरसेवक
श्री.चेतन नागेश गायकवाड प्रदेश सरचिटणीस रा.यु.काँ.
शुभेच्छुक : ईच्छा भगवंताची ग्रुप, सोलापूर